सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ४ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आसाम ते मणिपूर पावसाचा प्रकोप! ४८ जणांचा मृत्यू

### ६०० ठिकाणी भूस्खलन, १५०० गावांना फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४गुवाहाटी**

पूरामुळेआसाम आणि इतर ईशान्येकडील राज्यांत अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. जनजीवन विस्कळीत झालं आहे. पावसाचा प्रकोप पाहायला मिळत आहे. आसाममधीलपूर परिस्थिती आणखी बिकट झाली. पुरामुळे सहा जणांचा मृत्यू झाला, त्यामुळे या वर्षी पूर आणि भूस्खलनात मृतांची संख्या १७ वर पोहोचली आहे. तसेच सिक्कीमसह या प्रदेशातील सात राज्यांमध्ये मृतांची संख्या ४८ च्या आसपास पोहोचली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आसाम आणि इतर ईशान्येकडील राज्यांमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मोदींनी मंगळवारी आसाम आणि सिक्कीमच्या मुख्यमंत्र्यांशी तसेच मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याशी ईशान्येकडील राज्यांमधील पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी चर्चा केली. त्यांनी पूराचा सामना करण्यासाठी तसेच मदत आणि पुनर्वसन प्रयत्नांमध्ये केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं.मणिपूरमध्ये आलेल्या पुरामुळे ५६,००० हून अधिक लोकांना फटका बसला आहेत आणि १०,४७७ घरांचं नुकसान झाले आहे. पुरामुळे राजधानी इम्फाळ आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील अनेक




भागात पूर आला आहे.

नागालँडमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे कोहिमा जिल्ह्यातील फेसामा गावात राष्ट्रीय महामार्ग-२ चा ५० मीटरचा भाग वाहून गेला. त्यामुळे नागालँड आणि मणिपूरमधील वाहतुकीच्या मुख्य मार्गाशी संपर्क तुटला. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, मणिपूरला जाणारे १०० हून अधिक मालवाहू ट्रक रविवारपासून रस्त्यावर अडकले आहेत. कारण पुढे जाण्याचा कोणताही मार्ग नाही

**२१ जिल्ह्यांमध्ये पूर, लाखो लोक बेघर**

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या रिपोर्टनुसार, २१ जिल्ह्यांमध्ये पूर आणि पावसामुळे ६.३३ लाखांहून अधिक लोकांना फटका बसला आहे. लाखो लोक बेघर झाले आहे. रिपोर्टमध्ये असंही म्हटलं आहे की २१ जिल्ह्यांतील १५०६ गावांमधील १४,७३९ हेक्टरपेक्षा जास्त पीक जमीन पाण्याखाली गेली आहे. आसाममध्ये अनेक ठिकाणी ब्रह्मपुत्रा आणि इतर सहा नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत.

**६०० हून अधिक भूस्खलनाच्या घटना**

ईशान्येकडील राज्यांमधील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे पासून पाऊस आणि पुरात झालेल्या ४८ मृत्यूंपैकी सुमारे १७ जणांचा मृत्यू आसाममध्ये झाला आहे. अरुणाचल प्रदेशात १२, मेघालयात ६, मिझोराममध्ये ५, सिक्कीममध्ये ४, त्रिपुरामध्ये २ आणि नागालँड आणि मणिपूरमध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. गेल्या १०० दिवसांत फक्त मिझोराममध्ये ६०० हून अधिक भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत.

## ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यास सरकार तयार - किरेन रिजिजू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**

संसदेचे पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरू होईल. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी याची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, अधिवेशन २१ जुलै ते १२ ऑगस्ट चालेल. मिळालेल्या माहितीनुसार, सरकारने या अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यासही सहमती दर्शविली आहे.



रिजिजू म्हणाले की, अधिवेशनादरम्यान ऑपरेशन सिंदूरवर चर्चा केली जाईल. प्रत्येक अधिवेशन विशेष आहे आणि आम्ही ऑपरेशन सिंदूरसह सर्व मुद्द्यांवर चर्चा करू. सरकारला सर्वांना सोबत घेऊन चालायचे आहे. आम्ही विरोधकांशी याबाबत चर्चा केली, आशा आहे की, या बाबतीत सर्वजण एकसारखी भूमिका घेतील. पावसाळी अधिवेशनात नियमांनुसारच सर्व मुद्द्यांवर चर्चा केली जाईल.

एकीकडे विरोधक सतत सरकारकडे ऑपरेशन सिंदूरवर विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करत होते. मंगळवारी १६ विरोधी यासाठी पक्षांनी पंतप्रधान मोदींना पत्रही लिहिले होते. पण, आता सरकारने पावसाळी अधिवेशनाची तारीख जाहीर केली आहे. म्हणजेच, विरोधकांच्या सततच्या मागणीनंतरही ऑपरेशन सिंदूरवर कोणतेही विशेष अधिवेशन होणार नाही. जी काही चर्चा होईल, ती सर्व पावसाळी अधिवेशनातच होईल.मंगळवार झालेल्या या बैठकीत काँग्रेस, समाजवादी पक्ष, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, राजद, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), यासारख्या प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांनी भाग घेतला.

## इंडिया आघाडीत बिघाडी? राष्ट्रवादीचा काढता पाय, शिवसेनेच्या राऊतांची सावरासावर

### 'त्या' निवेदनावर शरद पवारांची सहीच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नवी दिल्ली**

विरोधी पक्ष एकत्र येवून इंडिया आघाडीची स्थापना झाली. इंडिया आघाडी सत्तेत आली नाही, परंतु त्यांनी भाजपला बहुमतापासून दूर ठेवण्यात यश मिळवलं. पण आता मात्र इंडिया आघाडीत काहीसं बिघाडी असल्याचं चित्र दिसतंय. एकाच वर्षात युती तुटताना दिसत आहे. अरविंद केजरीवाल यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार इंडिया अलायन्सपासून दूर जात आहेत, तर तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी जवळ येत असल्याचे चित्र आहे.

'ऑपरेशन सिंदूर' वर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया अलायन्सची आज नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला १६ विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. परंतु शरद पवार आणि केजरीवाल यांच्या पक्षातील कोणीही उपस्थित नव्हते. २०२४ मध्ये इंडिया अलायन्सपासून अंतर राखणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्या




टीएमसी पक्षाचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी बैठकीला हजेरी लावली. तर इंडिया आघाडीत नेमकं काय चाललंय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जे एक्केकाळी दूर होते, ते जवळ येताना दिसत आहे.

ऑपरेशन सिंदूरच्या मुद्द्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करण्यासाठी दोन महत्त्वाचे विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांनी इंडिया आघाडीच्या बैठकीपासून दूर राहून काम केले. इंडिया अलायन्सचा प्रमुख घटक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (एसपी) पत्रावर स्वाक्षरी केली नाही. तर आघाडील आकार देणाऱ्या नेत्यांमध्ये शरद पवार यांचे नाव समाविष्ट होते. त्यानंतरही शरद पवार बैठकीला उपस्थित राहिले नाहीत, त्यानंतर राष्ट्रवादी (एस) देखील इंडिया आघाडी सोडणार आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

आम आदमी पक्षाने ऑपरेशन सिंदूर आणि युद्धबंदीच्या मुद्द्यावर मोदी सरकारविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीही ते करत आहे, जेव्हा इंडिया अलायन्सने या मुद्द्यावर बैठक बोलावली होती, तेव्हा आम आदमी पक्ष उपस्थित राहिला नाही. आम आदमी पक्षाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया अलायन्सशी संबंध तोडले आहेत. त्यामुळे दिल्लीत असूनही केजरीवाल बैठकीला उपस्थित नव्हते.

## ठाकरेंच्या शिवसेनेत चाललंय काय? हकालपट्टीनंतर सुधाकर बडगुजर म्हणाले, पक्षात इतरही नाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नाशिक**

नाशिकमधील शिवसेना (ठाकरे) नेते सुधाकर बडगुजर यांच्यावर शिवसेनेने (ठाकरे) मोठी कारवाई केली आहे. पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत शिवसेनेने (ठाकरे) त्यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. नाशिकमधील शिवसेना नेत्यांनी पत्रकार परिषदेद्वारे ही माहिती दिली आहे. दरम्यान, या हकालपट्टीबाबत बडगुजर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, पक्षांतर्गत बाबींवर नाराजी व्यक्त करणं हा गुन्हा नाही. तरीदेखील पक्षाला अशी कारवाई करायची असेल तर त्यावर काय बोलणार?

सुधाकर बडगुजर म्हणाले, पक्षाने माझ्याशी कुठलीही चर्चा केली नाही. मी सध्या नाशिक शहराबाहेर आहे. आज नाशिक शिवसेनेची (ठाकरे) पत्रकार परिषद होती. मात्र, माझा नियोजित दौरा असल्यामुळे मी त्या पत्रकार परिषदेला हजर राहू शकलो नाही. मी जिल्हाध्यक्षांना त्याची पूर्वकल्पना दिली होती. पक्षांतर्गत बाबींवर नाराजी व्यक्त




करणं, मुख्यमंत्र्यांना भेटण्यावरून अशी कारवाई करणं चुकीचं आहे. कोणाला पक्षात ठेवायचं आणि कोणाला नाही हे पक्ष ठरवतो, पक्षप्रमुख त्याबाबतचा निर्णय घेतात. बडगुजर यांनी पक्षाने केलेल्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली.

बडगुजर यांना यावेळी विचारण्यात आलं की तुमची पुढची भूमिका काय? यावर ते म्हणाले, वेळ आल्यावर सांगेन. पक्षातून हकालपट्टी होण्याबाबत मला कुठलीही कुणकुण लागली नव्हती. मात्र, मी पक्षांतर्गत बाबींवर नाराजी व्यक्त केली होती. तो गुन्हा असेल तर पक्षप्रमुखांनी तसं सांगावं. हकालपट्टी करण्यापूर्वी मला माझी बाजू मांडण्याची संधी दिली असती तर मी पक्षप्रमुखांना भेटलो असतो. हकालपट्टीनंतर त्यावर काही पर्याय राहिलेला नाही. पक्षात माझ्यासह खूप जण नाराज आहेत. त्यांच्यापैकी मी माझं मत जाहीरपणे व्यक्त केलं. इतरही अनेक जण नाराज आहेत. त्यांनी देखील वेळोवेळी चर्चा केली होती. मी त्यांची नावं जाहीर करणार नाही. आम्ही सर्व गोष्टी संजय राऊत यांच्या कानावर घातल्या होत्या. मात्र, अचानक माझ्या हकालपट्टीचा निर्णय झाला आहे. हा एकतर्फी निर्णय आहे. न्यायालय देखील दोन बाजू ऐकून घेतं.

## आमचे मन साफ आहे, महाराष्ट्र हितासाठी... मनसे-उद्धवसेना युतीवर आदित्य ठाकरेंचे सूचक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

दिवाळीनंतर महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची शक्यता असल्याने सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. इच्छुक उमेदवारांनीही मतदारांना आकृष्ट करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांची जोरदार तयारी सुरू आहे. यातच मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीबाबत राजकीय वर्तुळात अनेक तर्क लढवले जात असतानाच उद्धवसेनेचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी सूचक विधान केले आहे.



पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्ही आमच्याकडून प्रतिसाद दिला आहे. आमची भावना व्यक्त केली आहे. मराठी माणूस व महाराष्ट्राच्या हितासाठी जो कोणी आमच्यासोबत यायला तयार असेल, त्यांना आम्ही बरोबर घेऊन महाराष्ट्र हितासाठी लढत राहू. अलीकडेच आमचे नेते दीपेश म्हात्रे व मनसेचे नेते राजू पाटील यांनी एकत्र येऊन आंदोलन केले. हे त्याचेच उदाहरण आहे. लोकांच्या मनात काय आहे हे आम्हाला माहिती आहे आणि आमचे मन साफ आहे. जो कोणी नेता महाराष्ट्र हितासाठी आमच्याबरोबर यायला तयार असेल, जो पक्ष पुढे येत असेल, आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र येऊन लढू, असे आदित्य ठाकरे यांनी नमूद केले.

## धनंजय मुंडे पुन्हा मंत्री होणार नाहीत ; त्यांचा शांत राहून दबाव टाकण्याचा प्रयत्न - करुणा शर्मा यांचे भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे हे सध्या प्रसार माध्यमांपासून अंतर राखून राहत असल्याचे दिसत आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी देखील भाषण करत नसल्याचे दिसून येत आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात देखील त्यांनी बोलणे टाळले. आता आज ते नाशिकमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात गेले होते तिथे त्यांचा मौन व्रत असल्याचे त्यांनी हात-खुणांनी दाखवले होते. यापूर्वी देखील ते काही दिवस इगतपुरी येथे विपश्यना केंद्रात होते. यावर करुणा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. करुणा मुंडे म्हणाल्या, जसे की आपण पाहत आहोत की आज त्यांच्याकडे कोणते पद नाही आणि पक्षावर कुठे तरी शांत राहून दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. जसे की त्यांचे लोक आहेत ते अशी बातमी पसरवत आहेत सोशल मीडियावर की धनंजय मुंडे परत मंत्री होणार, पण होणार नाही. पुढे बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या, हे राजकारणी लोक स्ट्रॅटजी प्लॅनर ठेवत असतात. जसे तुम्हाला माहीत आहे की पंकजा ताई पण अगोदर नैराश्यामध्ये होत्या ५ वर्षे त्यांच्याकडे काही काम नव्हते. तेव्हा त्यांनी शिवशक्ती रॅली काढली होती, त्यानंतर त्यांचा ग्राफ वाढत गेला आणि आज त्या मंत्री झाल्या. तसे आता धनंजय मुंडे करत आहेत.या लोकांकडे एक स्ट्रॅटजी प्लॅनर असतो एक, तो हे असे सगळं करायला सांगत असतो. अशी प्रतिक्रिया करुणा मुंडे यांनी दिली आहे.



## हरिसाल येथील इसमाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू : जंगलात कपडे,शरीराचे हाडे, डोकेच शिल्लक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मेळघाट**

धारणी तालुक्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्प हरिसाल वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या जंगलामध्ये हरीसाल येथील इसम जलतन लाकडे आणण्याकरता गेला असता त्याच्यावर जंगलातील शेवरी मुंडा परिसरात वाघाने हल्ला चढून पूर्ण मासासह त्याला फस्त केले असून त्या ठिकाणी त्याच्या शरीरातील हाडाचे अवशेष व डोक्याचे खाल्लेले शीर एवढाच पुरावा वाघाने शिल्लक ठेवलां असल्याची माहिती समोर येत आहे तर मंगळवार ला नव्याने रुजू झालेल्या नवीन वनपरिक्षेत्र अधिकारी व वन कर्मचाऱ्यांसमोर पेच निर्माण झालां असून शरीरातील हाडाचे अवशेष वैद्यकीय तपासणी करता प्रयोग शाळेत पाठविण्यात आले आहे

मेळघाट व्याघ्र प्रकल्प गुगामल वन्यजीव विभाग अंतर्गत हरी साल वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या गावातील रहिवासी मुन्नू बाबला जावरकर वय ६० वर्ष हे रविवार लां हरीसाल वनपरिक्षेत्रातील जंगलामध्ये जाळण्यासाठी लाकडे आणण्याकरता घरून निघून गेले होते ते दोन दिवसा पासून घरी न परतल्या मूळे त्यांच्या पत्नी सह मुलांनी व नातेवाईकांनी परिसरात त्यांचा शोध घेतला परंतु ते आढलून आले नाही तर बुधवार ला सकाळी दहा वाजता त्यांचा शोध जंगलाकडे घेण्याकरिता नातेवाईक गेले असता त्यांचे कपडे व शरीरातील हाडाचे अवशेष व डोक्याचे शीर तेथे पडलेले दिसले त्याचा अंदाज घेत त्यांच्या नातेवाईका सह परिसरातील नागरिकांनी त्याच्यावर वाघाने हल्ला केल्याचा केल्याची प्राथमिक माहिती समोर आली.

या घटनेची माहिती हरिसाल वनपरिक्षेत्र अधिकारी व वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली त्यांनी लगेच घटनास्थळ गाठून पाहणी केली असता तेथे वाघाचे पगमार्क आढळून आले त्यामुळे सदर इसमावर वाघाचा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाकडून वर्तविण्यात आला आहे त्या इसमाची हाडाची अवशेष वनविभागासह वैद्यकीय चमूंनी ताब्यात घेऊन ते प्रयोग शाळेत तपासणी करता पाठविण्यात आली असून नेमकी तीच व्यक्ती आहे का याचा शोध घेणे सुरू असून हरिसाल वनपरिक्षेत्रात मंगळवारी नवीन वनपरिक्षेत्र अधिकारी रुजू झाल्याने त्यांच्यासमोर परिसरात घडलेली ही पहिलीच घटना असून व त्यांच्यासह वन कर्मचाऱ्यांमध्ये या घटनेने पेच निर्माण केला आहे

**आमदार काळे नी कुटुंबासह वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांची घेतली भेट**

मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांना हरिसाल येथील मुन्नू बाबला जावरकर या इसामाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ त्याचे घर गाठून कुटुंबीयांची भेट घेवून घटनेची माहिती घेतली त्यासह हरिसाल वनपरिक्षेत्र कार्यालयात वनाधिकारी राहुल धाईत यांची भेट घेवून त्यांच्याकडून संपूर्ण घटनेची माहिती घेऊन उपवनसंरक्षक गुगामल वन्यजीव त्यासह क्षेत्र संचालक वनविभाग अमरावती यांना नेहमी वाघाचे हल्ले वाढत असल्यामुळे वाघाला पकडण्याचे सूचना दिल्या आहे त्यासह कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान म्हणून दहा हजाराची मदत सुद्धा त्यांनी केली आहे त्यांच्यासोबत गावातील माजी उपसरपंच गनेश येवले त्यांचे स्वीय सहायक आकाश खैरकर सह गावातील प्रतिष्ठित नागरिक हजर होते

संपादकीय ......

# जम्मू-काश्मीरचे चोख उत्तर!

दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर'नंतर जम्मू आणि काश्मीर सरकारने राज्य मंत्रिमंडळाची बैठक पहलगाममध्येच घेत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. भीतीच्या छायेखाली असलेल्या पर्यटन व्यवसायाला धीर देण्याच्या या प्रयत्नाची नोंद घ्यावी लागेल. कारण, आव्हान आहे ते या हल्ल्यानंतर कोलमडलेला पर्यटन उद्योग आणि त्यावरच अवलंबून असलेल्या काश्मीरला सावरण्याचे...

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर दिलेच, या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मीर राज्य सरकारने पहलगामला राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेत दिलेले उत्तरही महत्त्वाचे ठरते. या राज्याकडे मोठ्या संख्येने वळणारा पर्यटकांचा ओघ थांबवत विकासाची प्रक्रिया रोखण्याचा हेतूही हल्ल्यामागे होता. राज्यातील नागरिक देशाच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाले की, काश्मीरचा मुद्दा संपेल, या भीतीपोटी केंद्र-राज्याने चालवलेल्या विकास प्रकल्पांना खो घालण्याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. त्याच पहलगाममध्ये बैठक घेत पाकच्या या भ्याडपणाला भीक घालत नसल्याचे सरकारने दाखवून दिले. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा त्यासाठीचा पुढाकार माध्यमांच्या गदारोळात काहीसा दुर्लक्षित झाला असला, तरी सरकारने घेतलेल्या या भूमिकेचे महत्त्व कमी होत नाही. देश आणि जगभरातील पर्यटकांना आम्ही तुमच्यासोबत आहोत, असा संदेश त्यांनी या बैठकीच्या माध्यमातून दिला, पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या गंभीर प्रश्नाकडेही केंद्राचे लक्ष वेधले. जम्मू-काश्मीर आणि पहलगामला सावरण्याचा निर्धार मंत्रिमंडळाने केला. सरकार दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यांना घाबरणार नाही, असे ठणकावून सांगितले. 'एक्स'वरून बैठकीची छायाचित्रे जाहीर करत पाकिस्तानबरोबर त्यांच्या पाठीराख्यांना आणि जगालाही आपला हा निर्धार कळवला. जम्मू-काश्मीर घाबरलेला नाही; तर तो दृढ, सशक्त आणि निर्भय आहे, असे सरकारने यासंदर्भात स्पष्टता देताना म्हटले आहे. जम्मू-काश्मीर मंत्रिमंडळाच्या बैठका एरव्ही श्रीनगर आणि जम्मूत होत असतात. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या दोन राजधान्यांबाहेर पहलगामला सारे मंत्रिमंडळ नेत पर्यटनहिताचे निर्णय घेतले. यावरच ते थांबलेले नाहीत, उत्तर काश्मीरमधील गुलमर्गमध्ये मंत्री, सचिव, विभागीय आयुक्त आणि वरिष्ठ पोलिस अधिकार्यांसोबत बैठक घेऊन पर्यटन व्यवसाय सावरण्यासाठी उपाययोजनांवर विचारविनिमय केला. जम्मू-काश्मीर चेंबर ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रीजच्या प्रतिनिधींसोबत चर्चेत पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी ठोस पाऊल उचलण्यावर भर दिला. शैक्षणिक पर्यटन वाढविण्याकडे लक्ष देण्याचे ठरवले. केंद्र सरकारने संसदेच्या स्थायी आणि संसदीय सल्लागार समितीच्या बैठका काश्मीरमध्ये घेतल्या जाव्यात, त्यातून पर्यटकांच्या मनात नवा विश्वास निर्माण होण्यास मदत होईल, अशी विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांनी केली आहे. नीती आयोगाच्या अलीकडेच झालेल्या बैठकीत त्यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना आपल्या राज्यांच्या महत्त्वाच्या बैठका, प्रदर्शने काश्मीरमध्ये भरावावीत, अशी विनंती करत 'काश्मीरला या' असे आवाहन केले होते. पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांची आठवण आणि त्यांना श्रद्धांजली म्हणून बैसरनमध्ये स्मारक बनवण्याची घोषणा या बैठकीनंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत त्यांनी केली.

या सर्व घटनाक्रमाची आणि घडामोडींची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. पहलगामवरील हल्ल्यानंतर काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असून, पर्यटन व्यवसाय संकटात आहे. दहा टक्के जीडीपीसह सुमारे अडीच लाख कोटींची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याने बदलत्या परिस्थितीत राज्यासमोर ती रुळावर आणण्याचे मोठे आव्हान आहे. मोडून पडलेला पर्यटन व्यवसाय आणि त्याद्वारे राज्याची अर्थव्यवस्था सावरावी लागणार आहे. पर्यटकांना काश्मीरकडे वळवणे, त्यासाठी त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे कठीण काम आहे. राज्यात नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर आहे. केंद्र सरकारच्या सहकार्याने काश्मीर पुन्हा उभारण्याचे काम या सरकारला करावे लागणार आहे. त्यासाठीचे प्रयत्न सरकारने सुरू केले आहेत. काश्मीर पर्यटनाची आस लावून बसलेल्या पर्यटकांसाठी या हालचाली दिलासादायक म्हणाव्या लागतील. सरकारच्या एकत्रित प्रयत्नांमुळे लोकांमधील भीती लक्षणीयरीत्या कमी होईल, सुरक्षितता आणि आत्मविश्वासाची एक नवीन भावना निर्माण होईल आणि शेवटी पर्यटनाचा मार्ग मोकळा होईल, त्यामुळे राज्याला आर्थिक दिलासा मिळेल आणि परिस्थिती सामान्य होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

कलम ३७० हटवल्यानंतर राज्यावरील दहशतवादाचे मळभ हळूहळू हटत होते. परिस्थिती सामान्य होत होती. देशभरातील हौशी पर्यटकांनी मनातील भीती दूर सारत मोठ्या संख्येने काश्मीरला हजेरी लावली. खोर्यातील सर्वच पर्यटनस्थळे गजबजली. २०१८ मध्ये एक कोटी साठ लाखांवर असलेली पर्यटकसंख्या गेल्यावर्षी (२०२४) दोन कोटी ३६ लाखांवर पोहोचली. एकट्या काश्मीर खोर्यात पस्तीस लाखांवर पर्यटक गेले. पर्यटकांचा उत्साह पाहून हॉटेल, टूर्स आणि ट्रॅव्हल्स ऑपरेटर्स, करमणूक अशा सर्वच उद्योग-व्यावसायिक क्षेत्रांत चैतन्य आले होते. नवनवीन हॉटेल्स, करमणुकीची साधने, आधुनिक चित्रपटगृहे यांचा प्रवेश झाला होता. राज्यात झालेले 'खेलो इंडिया' सामने, पहिलाच सनबर्न संगीत महोत्सव, एफ फोर कार शो, जगभरातील नामांकित ब-ँडच्या आलिशान शोरूम यामुळे देश-विदेशातील पर्यटक राज्याकडे वळत होते. राज्याच्या जीडीपीमध्ये पर्यटन क्षेत्राचा वाटा आठ टक्के आहे. वार्षिक सुमारे १२ हजार कोटींची उलाढाल पर्यटन उद्योगामुळे झाली. यामुळे उत्साहित झालेल्या राज्याने २०३० पर्यंत ही उलाढाल ३० हजार कोटींवर नेण्याचे उद्दिष्टही ठेवले होते. एकूणच काश्मीरचा चेहरामोहरा बदलत असताना हल्ल्याचे गालबोट लागले. त्यामुळे काश्मीरचे सारे सौंदर्यच जणू झाकोळले! पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली. पर्यटन उद्योगावर अवलंबून असलेला रोजगार ठप्प झाला.

# कोकोपीटसह ऊस बेणे महागले; ऊस रोपं महागणार का? वाचा सविस्तर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक –** कोकोपीटसह ऊस बियाणे यांची वाहतूक खर्च, अवकाळी पावसाचा फटका आदी कारणांमुळे रोपनिर्मिती महागली असल्याचे दिसून येत आहे.




उसाची लागण करून लागणारा कालावधी, उगवण क्षमतेची हमी नसल्याने अलीकडच्या काळात काही शेतकरीऊस रोपवाटिकामध्ये तयार केलेली रोपे आणून उसाची लागण करू लागले आहेतसध्या जून ते ऑगस्ट महिन्यात आडसाली उसाच्या लागणी होत असतात. तयार रोपांची लागण केल्यास रोपांची मर होत नाही. त्यासाठी तयार रोपांची लागण करण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. यंदाच्या हंगामात रोपे तयार करण्याच्या साहित्यात वाढ झाल्याने रोपांचे दर दहा टक्के वाढले आहेत. हेच दर थोड्या फरकाच्या अंतरावर रोपवाटिकेत वेगवेगळे दर दिसत आहेत. अनेक रोपवाटिकांना पावसाचा फटका बसून त्यांचे नुकसान झाले.गेल्यावर्षी उसाचे रोप तयार करण्यासाठी कोकोपीटचा टनाचा दर ५५०० रुपये होता. तर सध्याचा दर ६५०० आहे स्ट्रेचा दर ७ रुपये ५० पैसे होता. त र सध्याचा दर १० रुपये आहे. गेल्यावर्षी एका रोपाचा दर २ रुपये ३० पैसे होता.

कृषी विशेष

**रोपवाटिकांना वळवाच्या पावसाचा जोरदार फटका** कोकोपीट हे केरळ राज्यातून येते. उसाची वाढ होण्यासाठी कोकोपीट खत म्हणून वापरले जाते. त्यामुळे रोपे जोमदार तयार होतात त्यामुळे त्याला मागणी असते; मात्र पावसाचा फटका रोपवाटिका मालकांना बसत आहे.

**कोकोपीटमध्ये तयार झालेली रोपे सशक्त–** सरळ पद्धतीने उसाच्या कांड्याची लागण केल्यास वेळ वाया जातो. जमीनीची मशागत करताना अनेक अडचणी असतात रोपांची उगवण व्यवस्थित होत नाही. तर कोकोपीटमध्ये तयार झालेली रोपे सशक्त असतात रोगाला बळी पडत नाहीत.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आरोग्य संपदा आहार

# नीट मांडी घालून जमिनीवर बसून जेवण्याचे फायदे माहिती आहेत? टेबल-खुर्चीपेक्षा फायद्याचं कारण..

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** – काही वर्षांआधी तुम्हाला आठवत असेल की, कुटुंब एकत्र राहत असताना सगळेजण खाली जमिनीवर बसून जेवण करत होते. पण आजकाल कुटुंब वेगळी झालीत आणि जास्तीत जास्त लोक टायनिंग टेबलवर बसून, सोफ्यावर बसून किंवा खुर्चीवर बसून जेवण करतात. हा एक लाइफस्टाईलचा भाग झाला आहे. पण अनेकांना हे माहीत नसतं की खाली मांडी घालून बसून जेवण्याचे शरीराला काय काय फायदे मिळतात. बरेच लोक लोक याकडे जुनी पद्धत म्हणून बघतात. पण याच्या फायद्यांकडे दुर्लक्ष करतात. तेच फायदे आज आम्ही सांगणार आहोत.

**खाली बसून जेवण्याचे फायदे**

खाली बसून जेवण करण्याचे अनेक फायदे आहेत. सर्वात महत्वाचा फायदा म्हणजे पचनक्रिया सुधारते. जमिनीवर ताट असल्याने आपल्याला घास घेण्यासाठी सतत वाकावे लागते. यामुळे शरीराची हालचाल होऊन अन्न योग्य पद्धतीने पचतं. जमिनीवर बसून जेवल्यास वजन कमी करण्यात मदत होते. तसेच पोट सुटत नाही. अपचन, जळजळ असे पोटाचे विकारही होत नाहीत.

जेवायला मांडी घालून बसल्याने शरीराच्या नसांचा थकवा कमी होतो. डायनिंग टेबलवर बसण्याऐवजी जमिनीवर बसल्यास शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो. शरीराची लवचिकता वाढते. आपण जेव्हा जमिनीवर बसून जेवत असतो, तेव्हा पाठीचा कणा ताठ राहतो. तसेच पोट, पाठ, खाद्यांची सतत हालचाल होत राहते.

गरजेचं आहे तेवढंच जेवण होतं

– सुखासन किंवा मांडी घालून जमिनीवर बसणे आणि जेवण करणे यामुळे जास्त जेवण केल्यास योग्य प्रमाणात जेवण करता येतं. हा लठ्ठपणा कमी करण्यासाठी उत्तम उपाय मानला जातो. खाली बसून जेवल्याने जेवढे आवश्यक आहे, तेवढेच आपण अन्न ग्रहण करतो. त्यामुळे पचन तंत्र सुरळीत राहतं आणि लठ्ठपणा कमी करण्यास मदत होते. व्यक्तीचे वजन नियंत्रित राहते.

– पाठीचा कणा ताठ व मजबूत होतो आणि पाठीच्या समस्या दूर होतात. तसेच खाली बसून जेवल्याने जेवणावर जास्त लक्ष असतं. मेंदू शांत राहतो. मेंदूला लवकर कळतं की, आपलं पोट भरलं आहे. खुर्चीवर बसून किंवा उभे असताना रक्तपुरवठा हा पायाकडे जात असतो. त्यामुळे पचन तंत्र सुरळीत काम करीत नाही. याने अपचन, ॲसिडिटी व इतर रोगांना




आमंत्रण दिल्या जातं.

**कॅलरीज कमी होतात**

जमिनीवर बसून जेवण हळूहळू करता येतं. यामुळे आपण कमी प्रमाणात खातो. हे शरीरासाठी चांगलं असतं. यामुळे अधिक कॅलरीचे सेवन होत नाही. अशात यामुळे तुम्हाला वजन कमी करण्यास मदत मिळते.

**गुडघे दुखीची समस्या दूर होते**

जमिनीवर बसून खाल्ल्याने नितंबाच्या जोड, गुडघे आणि घोटे लवचिक होतात. या लवचिकपणामुळे पुढे चालून उठण्या-बसण्यासाठी त्रास होत नाही. हाडांचे रोग, समस्या दूर राहतात.

**हृदय निरोगी राहतं**

मांडी घालून बसणं हे वेगवेगळ्या योगासनातील एक आसन आहे. या आसनामध्ये शरीर आरामदायी अवस्थेत असतं आणि तणाव दूर होतो. हृदय देखील स्वस्थ राहतं. बसून खाल्ल्याने शरीरामध्ये रक्ताभिसरण सहज होते. जमिनीवर बसून खाल्ल्याने माणूस उठताना आधार न घेता उठतो यामुळे शरीर मजबूत आणि लवचिक राहते.

# चित्तथरारक, पाण्यावर तरंगणारा मल्लखांब, एचव्हीपीएमच्या उन्हाळी शिबिरात जलतरण विभागाचे प्रात्यक्षिक सादरीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती –** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या आंतरराष्ट्रीय जलतरण विभागाचा लौकीक राष्ट्रीय-आंतरराष्ट्र रीय स्तरावरील असल्याची अनुभूती जलतरणपटूच्या चित्तथरारक प्रात्यक्षिक सादरीकरणातून नागरिकांना झाली. सिंक्रोनाइज्ड स्विमिंग, वॉटर पोलो, स्विमिंग ड्रिलसोबत अंधारामध्ये पाण्यावर जळती मशाल, कारंजा आणि पाण्यावर तरंगणारा मल्लखांबची प्रात्यक्षिके चित्तथरारक आणि रोमहर्षक ठरली. एचव्हीपीएमच्या उन्हाळी शिबिराचा समारोप सोमवार २ जूनला सायंकाळी ६ वाजता झाला. त्याचे औचित्य साधून मंडळाच्या जलतरण विभागात हे चित्तथरारक जलतरण प्रात्यक्षिक पार पडले. विशेष म्हणजे मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी या सोहळ्याला उपस्थित राहून खेळाडूंचा सत्कार व कौतुक केले.



एचव्हीपीएमचे कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित समारोपीय सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका राधा कुरील, टॉमी जोश, प्रा. प्रणव चेंडके, प्रा. दीपा कान्हेगावकर, पडोळे, डॉ. संजय तीरथकर, जलतरण विभागप्रमुख डॉ. योगेश निर्मल, शिबिर संचालक राजेश महात्मे उपस्थित होते. यावेळी प्रभाकरराव वैद्य यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती पुरस्कार प्राप्त सांजली वानखडे, पार्थ अंबुलकर, यश दुर्गे, वेदांत सराफ, कौस्तुभ गाडगे, स्वर्णीम शेटे, मंथन शिवणीकर, पीयूषीनी देशमुख, भूमिका गिरी, अंजली राऊत, नारायणी यांच्यासह विविध पुरस्कार प्राप्त १७ जलतरणपटूंचा सत्कार घेण्यात आला.या संपूर्ण प्रात्याक्षिकांच्या सादरीकरणाचे संचालन महेंद्र लोणकर यांनी करत जलतरणाचे महत्व, कौशल्य आणि जलतरणाचे प्रकार आदीबाबत माहिती दिली. जलतरण विभागाचे प्रमुख डॉ. योगेश निर्मळ यांच्या मार्गदर्शनात आयोजित सोहळ्यात जलतरणपटूंनी विविध कवायती सादर करत उपस्थित नागरिकांची मने जिंकली. सोहळ्याचे सूत्रसंचालन करून आभार प्रा. आशिष हटेकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी मयूर कुमार, प्रा. मनोज कोहळे, गोहाड यांनी परिश्रम घेतले आहेत.जळती मशालसोबतच मल्लखांबने वेधले लक्ष हव्याप्रमंच्या जलतरण विभागाद्वारे आयोजित जलतरण प्रात्यक्षिक व कवायती मध्ये पाण्यावर तरंगणारा मल्लखांब नेत्रदीपक ठरला. मल्लखांब विभाग प्रमुख प्रा.मयूर दलाल यांच्या मार्गदर्शनात ६ मुली व १० मुलांच्या चमूने तलवार, जळती मशालसह विविध मल्लखांब कवायतीच्या सादरीकरण उपस्थितांची नेत्रदीपक ठरले. दरवर्षी जलतरण विभागाच्या सोहळ्यात पाण्यावर तरंगणारा मल्लखांब कवायती आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

# सुनीताची एनआयए' कडूनही चौकशी, काश्मीरला नेणार..

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर–** पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडणाऱ्या नागपुरातील सुनीता जामगडेच्या चौकशीसाठी काश्मीर पोलीस नागपुरात दाखल झाली असल्याची माहिती आहे. कपिलनगर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या संत कबीर नगर येथील रहिवासी सुनीता जमगडे काही दिवसांपूर्वी नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून बेकायदेशीरपणे पाकिस्तानात गेल्या होत्या.सुनीता कारगिलजवळील हुंडरमन गावातून पाकिस्तानच्या एका धार्मिक नेत्याला भेटण्यासाठी एलओसी ओलांडून पाकिस्तानात गेल्या होत्या. भारताची सीमा पार करत पाकिस्तानात गेलेली सुनीता मागील आठवड्यात नागपुरात परत आली होती. दरम्यान, सुनीता जामगडे या महिलेला काश्मीर पोलीस तपासाकरता काश्मीरला ही घेऊन जाऊ शकतात, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी न्यायालयाच्या आदेशानंतर वॉरंट घेऊन ही कारवाई केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.



सुनीता नागपुरातून ४ मे रोजी काश्मीरला फिरायला जात आहे, असे सांगून नागपुरातून घरून निघाली होती. त्यानंतर १४ मे रोजी कारगिल पोलिसांकडून माहिती मिळाली होती की मुलाला सोडून ती पाकिस्तानला गेली. त्यानंतर पाकिस्तान प्रशासनाने तिला बीएसएफकडे सुपूर्द केले. बीएसएफकडून महिलेला ताब्यात घेतल्यानंतर अमृतसर पोलिसांना प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यानंतर नागपूरात आणण्यात आले. सध्या या प्रकरणी राष्ट्रीय एजन्सी ही तपास करत आहे.दरम्यान, सुनीताने गुगल मॅपच्या मदतीने एलओसी क्रॉस केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

# सावरकर जयंतीनिमित्त विविध वेशभूषा स्पर्धा

## चित्पावन ब्राह्मण संघाच्या कार्यक्रमात सहा राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेचे सादरीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती** – स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त चित्पावन ब्राह्मण संघाच्या स्थानिक शाखेने विविध वेशभूषा स्पर्धा आयोजित केली होती. देशभरातील वेगवेगळ्या राज्यांमधील पेहरावांचे सादरीकरण हा या स्पर्धेचा उद्देश होता.

त्यानुसार या स्पर्धेत अनेकांनी सहभाग घेतला. यावेळी मराठी, पंजाबी, राजस्थानी, केरळी, गुजराती, काश्मीरी वेशभूषेचे सादरीकरण करण्यात आले. येथील बडनेरा रोड स्थित श्री. समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या सभागृहात सायंकाळी साडेसहा वाजता हा कार्यक्रम सुरु झाला. खुल्या प्रांगणात आयोजित ही स्पर्धा पावसाचा व्यतय लक्षात घेता सभागृहात घेण्यात आली. ही स्पर्ध सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली होती. कार्यक्रमाचा प्रारंभ जयोस्तुते या गीताने व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, भारत माता तसेच छत्रपती श्री.शिवाजी महाराजांच्या प्रतमा पूजनाने झाला. यावेळी शतकीरणांनी करु निरंतर नमितो तुजला कलेश्वरा या नांदीही सादर करण्यात आली. कार्यक्रमाला चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्रीरंग फाटक तसेच परीक्षक संगीता माथाने,.मधुसूदन वटक आणि पूर्वा सोपान गोडबोले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.छोट्या गटात सहा स्पर्धकांनी वेशभूषा सादर केली. लवकुश-अद्वय सारंग लिमये व अनय सारंग लिमये. सैनिक-युगांश हरीश जडे, श्रीकृष्ण-रिदम गुल्हाने, झाशीची राणी-तीर्था राहुल बलखंडे, भारत माता-आरोही राहुल बलखंडे आणि मदर तेरेसा-निर्वेश गजानन चौधरी यांनी सादर केली. या गटात निर्वेश चौधरीला प्रथम, आरोही बलखंडेला द्वितीय तर रिदम गुल्हाने याला तृतीय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. मोठ्या गटात पाच स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर-सर्जेराव गलपट, नेताजी सुभाषचंद्र बोस-अविनाश राजगुरे, गाडगे महाराज-अर्चना वऱ्हाडपांडे, लोकमान्य टिळक-वसंत साठे, तुकडोजी महाराज-वसंत साठे आणि सावित्रीबाई फुले-सुजाता चंद्रशेखर पेंडसे यांनी सादरीकरण केले. यामध्ये वसंत साठे यांना प्रथम क्रमांक, सर्जेराव गलपट यांना द्वितीय क्रमांक तर अर्चना वऱ्हाडपांडे यांना तृतीय क्रमांक देण्यात आला. सर्वांना रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले. यानंतर परीक्षकांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉईंट व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ४ जून २०२५

शहर/ग्रामिण

# पैसे दुप्पट करून देण्याच्या आमिषाच्या प्रकरणात सहा लुटारू पोलिसांच्या ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** मंदिरात पुजा करून पैसे दुप्पट करण्याची बतावणी करून चांदुररेल्वे येथील सुधाकर नामदेव राऊत यांना मध्यस्थ व्यक्तीने अचलपूर येथील त्रिवेणी संगम मंदिरात बोलावल्यानंतर राऊत यांना लुटल्याच्या घटनेप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहा जणांना अटक व रोख रक्कमसह १० लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

शरद दिगांबर ढोके (वय ५३ रा. शहापुर, वरुड), लाला उर्फ मनोजकुम ार फुलचंद जयस्वाल (वय ४२ रा. फ्रेजरपुरा, अमरावती), निलेश देवकरण यादव (वय ४०. रा. राजापेठ), प्रदिप रामराव वैराळे (वय ४७), शुभमगोपाल वैराळे (वय २६ दोन्ही रा. राजणापूर्णा, ता. चांदुर बाजार) आणि गोलू उर्फ जयकुमार जगदीश गेडाम (वय ४० रा. प्रबुध्द मंडळ, फ्रेजरपुरा, अमरावती ) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत, अशी माहिती पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी माध्यमांना दिली.अचलपूर ठाण्याच्या हद्दीत सोमवारी कार खरेदीच्या नावाखालीएका इसमाला मारहाण करून लुटल्याची घटना उघडकीस आली होती. या घटनेत जेव्हा गुन्हेशाखेच्या पथकाने सखोल चौकशी केली असता प्रकरण दुसरेच समोर आले. चांदुर रेल्वे तालुक्यातील सुपलवाडा येथील सुधाकर नामदेव राउत यांचा गावातील मित्र सचिन ठाकरे याने काही दिवसापूर्वी त्यांना सांगितले की, माझ्या ओळखीचा दिलीप राऊत पूजा करून पैसे दुप्पट करून देतो त्यावरून दोघेही दिलीप राऊत याला भेटायला गेले होते. पुजा केल्यानंतर पैसे दुप्पट होतात प असे दिलीपने सुधाकर राऊत यांना सांगितले. त्यामुळे सुधाकर यांनी कोणाला काही सांगितले नाही आणि सोमवारी १० लाख रुपये, सुधाकर राऊतने मोठ्या भावाला ३ लाख ५० हजार रुपये परत घेऊन जाण्यास सांगितले. त्यामुळे तो पैसे घेऊन परत निघाला आणि दिलीप व सुधाकर ६ लाख ५० हजार रुपये घेऊन कारने चांदुरबाजार ते अचलपूर मार्गाने निघाले. मध्ये त्रिवेणी संगम मंदिराजवळ त्याने कार थांबविली आणि पुजा करण्याकरिता ते मंदिरात गेले. पुजा सुरु करण्याआधीच एका कारमध्ये ४ ते ५ इसम आले आणि पोलिसांची धाड पडली, असे म्हणून दोघांना मारहाण केली आणि रोख ६ लाख ५० हजार रुपये आणि दिलीप राऊतला सोबत घेऊन गेले. पोलिसांची धाड पडल्यामुळे सुधाकर राऊत घाबरले आणि त्यांनी अचलपूर पोलिसांना माहिती दिली. तसेच कार खरेदी करीता एजंटसोबत आलो असता अनोळखी चार ते पाच इसम आले आणि मारहाण करून ते रोख रक्कम व एजंटला सोबत घेऊन गेल्याचे सांगितले. पोलिसांनी तपासचक्र फिरवीले परंतु ठोस काही हाती लागले नाही. अखेर पोलिसांनी सुधाकर राउतला विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी घडलेला घटनाक्रम सांगितला. त्यानंतर पोलिसांच्या तपासाला गती आली. पैसे दुप्पट करून देणाऱ्या दिलीप राऊत बाबत माहिती घेतली असता या नावाचा व्यक्ती गावातच राहत नाही, असे स्पष्ट होताच पोलिसांनी सुधाकर राऊतला रेकॉडवरील गुन्हेगार शरद ढोकेचा फोटो दाखविला. तेव्हा शरद ढोके हाच दिलीप राऊत असल्याचे स्पष्ट होताच पोलिसांनी रात्रीतून सहा आरोपींना अटक केली. तसेच त्यांनी गुन्ह्यात वापरलेली कार, दुचाकी व सहा मोबाईल आणि हिसकावलेली रक्कम असा एकूण १० लाख ४६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणातील अन्य दोन पसार आरोपींचा पोलीस त्यांच्या शोधात आहेत.पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकजकुमार कुमावत, शुभम कुमार सहाय्यक पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, नितीन इंगोले, विष्णु राठोड, तस्लीम शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली.–

# ऑनलाइन पोर्टल बंद; चांदूर बाजारचे ज्वारी विक्रेते प्रतिक्षेत

## दोनदा मुदतवाढ देऊनही प्रतिसाद शून्यच; १५ जूनपर्यंत तिसरी संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४चांदुर बाजार–** ज्वारी खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करावी लागते, परंतु गेल्या २७ एप्रिल पासूनच ऑनलाइन पोर्टल चालत नसल्यामुळे शेकडो शेतकरी, आपली ज्वारी खरेदी करण्यासाठी नोंदणीच्या प्रतीक्षेत आहेत. केव्हा पोर्टल सुरळीत सुरू होईल आणि केव्हा नोंदणी होईल, असे प्रश्न ते संबंधितांना विचारत आहेत. परंतु यंत्रणेकडे त्यांच्या प्रश्नांचे नेमके उत्तर नाही. परिणामी शेतकऱ्यांमध्ये असंतोष खदखदत असून त्याचा केव्हा स्फोट होईल, हे सांगता येत नाही.



### तिसऱ्या मुदत वाढीचा फायदा होणार का?

शेतकऱ्यांच्या मते ज्वारी खरेदीसाठीच्या नोंदणीसाठी शासनाने दोनदा मुदतवाढ दिल्याचा कोणताही फायदा त्यांना झाला नाही. त्यामुळे शासनाने वारंवार मुदतवाढ देण्याऐवजी पोर्टलमधील बिघाड दुरुस्त करावा, जेणेकरून संबंधित शेतकऱ्यांना त्याचा नेमका फायदा होईल. ज्वारी खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र नोंदणीचे पोर्टल चालत नसल्याने २५ टक्केही शेतकऱ्यांची नोंदणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे शासनाने नोंदणी पोर्टलमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. शासनाने याकडे लक्ष दिले पाहिजे. **–डॉ. प्रताप किटुकले,** अध्यक्ष, तालुका शेतकरी खविसे, चांदूर बाजार.

नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांना ज्वारी खरेदीसाठीची तारीख देण्यात येणार आहे. ज्वारीचा हमीभाव प्रतिक्विंटल ३ हजार ३७१ रुपये आहे. मात्र अद्याप २५ टक्केही शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झाली नाही. ती न झाल्याने शेतकऱ्यांची नोंदणी होणार केव्हा आणि ते ज्वारी विकणार केव्हा, अशी विवंचना निर्माण झाली आहे. खरीप हंगाम तोंडावर येऊन ठेपला आहे. शेतकऱ्यांची बी-बियाण्यांची जुळवा-जुळव चालू झाली आहे. अशात ज्वारी खरेदीची एप्रिलपासून सुरू झालेली नोंदणी प्रक्रिया, जून महिन्याला सुरुवात झाल्यावरही पूर्ण न झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ज्वारी खरेदीची शासकीय नोंदणी प्रक्रिया चांदूर बाजार तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्थेच्या कार्यालयात सुरू केली आहे. गेल्या २१ एप्रिलपासून नोंदणी सुरू झाली आहे. २७ एप्रिलपर्यंत केवळ १२० शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. त्यानंतर मात्र पोर्टल चालत नसल्यामुळे अंदाजे ५०० शेतकऱ्यांची नोंदणी अजूनही बाकी आहे. सुरुवातीला ही नोंदणी ३० एप्रिलपर्यंत करता येणार होती. त्यानंतर मुदतवाढ करून ३१ म ही नवी तारीख देण्यात आली. परंतु पोर्टल सुरळीत नसल्याने आता तिसऱ्यांदा मुदतवाढ देऊन नवी तारीख १५ जून ठरवण्यात आली आहे. परंतु जुना अनुभव लक्षात घेता या काळात तरी नोंदणी होणार की नाही, याबाबत शेतकरी साशंक आहे.

# समतेचा वारसा जपणारा रुख्मिणी मातेच्या पालखीचा स्वागत सोहळा

## माजी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती–** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपुरकडे आषाढी एकादशी सोहळ्यात सहभागी होण्याकरिता जाणाऱ्या माता रुख्मिणीच्या पालखीचे अंबानगरीत बियाणी चौकात माजी आमदार ड. यशोमती ठाकूर तसेच खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे या मंगलमय सोहळ्याकरिता सर्वच धर्मातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे हा स्वागत सोहळा सामाजिक समतेचा वारसा जपणारा ठरला. श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथील रुख्मिणी मातेची पालखी श्रीक्षेत्र पंढरपुर येथे होणाऱ्या आषाढी सोहळ्याकरिता जाण्याची ४३१ वर्षाची परंपरा आहे. श्रीक्षेत्र पंढरपुरच्या धर्तीवरच रुख्मिणी मातेचेही शासकीय पुजन व्हावे व श्रीक्षेत्र पंढरपुर येथे संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रमाणेच रुख्मिणी मातेच्या पालखीलाही मानाचे स्थान मिळावे यासाठी माजी आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी भगिरथ प्रयत्न केले होते. त्यानुसार आता श्रीक्षेत्र पंढरपुर येथे रुख्मिणी मातेचे शासकीय पुजन व सोबतच या पालखीला पंढरपुर येथे मानाची पालखी असा दुग्धशर्करा योग घडून आला आहे. श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून निघाल्यानंतर अमरावती शहरात आगमन होताच स्थानिक बियाणी चौकात या पालखीचे स्वागत करण्याची परंपरा माजी आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी सुरु केली. त्यानुसारच या पालखीचे उत्स्फूर्त अन् जंगी स्वागत करण्यात आले.कलर बॉक्सबियाणी चौकात भक्तीरसाला उधान बियाणी चौकात सायं ७:०० वा. रुख्मिणी मातेच्या पालखीचे आगमन होताच माजी आमदार ड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते व उपस्थित असंख्य भाविकांच्या उपस्थितीत पालखीचे जल्लोष आणि भक्ती भावात स्वागत करण्यात आले. रुख्मिणी मातेची पालखी आणि भक्तीरसात तल्लीन झालेले वारकरी सोबत टाळ मृदंग आणि मुखात विठ्ठलाचे नाम असा मंगलमय सोहळा पार पडला. हा प्रसंग म्हणजे उपस्थित भाविकांसाठी आनंदाची पर्वणी ठरला.













**पालखीत स्वागत सोहळा ठरला सर्वधर्मसम भावाचा सोहळ–**


तिवसा विधानसभा मतदारसंघातील मोर्शी, भातकुली, तिवसा अन् भातकुली तालुक्यातील असंख्य भाविक तसेच शहरातील असंख्य प्रतिष्ठित व्यक्तिंनी यावेळी उपस्थिती दर्शविली. तसेच या मंगलमय पवित्र सोहळ्यात सर्व समाजातील नागरीक आवर्जून उपस्थित होते. त्यामुळे हा पालखी स्वागत सोहळा सर्वधर्मसमभावाचे आणि एकतेचे दर्शन घडवणारा ठरला.डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या या स्वागत सोहळयाला स्वागत सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, यश खोडके, शहर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया , निवासी जिल्हाधिकारी भटकर साहेब, अमरावती पोलिस उपायुक्त सागर पाटील, अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष मोरे, माजी महापौर विलास इंगोले, बबलू शेखावत, पं.स. सभापती कल्पना दिवे, जयंत देशमुख, हरिभाऊ मोहोड, मनोजराव देशमुख, प्रविण मनोहर, प्रकाशराव काळबांडे, प्रतापराव भुयार, अमित गावंडे, नितीन कदम, सतिष गोटे, अभय देशमुख, रमेश काळे, मुकद्दर पठान, गजानन राठोड, दिलीप सोनोने, पंकज देशमुख, अभिजीत बोके, जितेंद्र ठाकूर, शैलेष काळबांडे, अनिकेत देशमुख, रोषणी पुनसे, वैभव वानखडे, रितेश पांडव आदी मान्यवर सहकुटुंब उपस्थित होते. तसेच भाविकही सहभागी झाले होते.

### माजी आमदार ठाकूर यांनी धरला फुगडीचा फेर

पालखीचे बियाणी चौकात आगमन होताच पालखी पदयात्रेत सहभागी झालेल्या सर्व वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी भक्तीत तल्लीन झालेल्या वारकऱ्यांसोबत माजी आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी फुगडीचा फेर धरला. त्यानंतर आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी काही अंतरापर्यंत पालखी खांद्यावर घेतली अन् त्यानंतर वारकऱ्यांचा पुढचा प्रवास सुरु झाला.



# अमरावती-मुंबई विमानाचे तिकीट १७,८५० रूपये



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–**

विमानसेवा सुरू करताना सर्वसामान्य माणसं विमान स्वारीचा आनंद घेऊ शकतील असे दावे करण्यात आले होते. मात्र आता या दाव्यातील ओलपणा बाहेर आला आहे. अमरावती - मुंबईचे ९ जूनचे तिकीट चक्क १७८५० रूपये एवढे आहे. एवढ्या मोठ्याप्रमाणात भाडे आकाल्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांसह श्रीमंतदेखील प्रवास करू शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.अमरावती - मुंबई विमानसेवा सुरू करताना एमएडीसीच्या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले होते की, क्षत्रिय उडाण योजनेच्या अंतर्गत अमरबिती कात्मुंबई विमानसेवेचे तिकीट सर्व टॅक्ससह २४९९ रूपये राहणार आहे. या सह एटीआर ७२ पलाईटच्या ७२ पैकी ३६ आसनांचा भार सरकार घेणार होती तर ३६ अलाएन्स एअर घेणारसोबत क्षेत्रिय उडाण सेवेच्या विमानामध्ये चढउतार दर आकारले जाणार नव्हते. पण या फ्लाईटचे तिकीट नेहमीच महागडे असते. आतापर्यंत मुंबई - अमरावती फ्लाईटचा रेट ८ ते ९ हजार एवढा होता. पण आता ९ जूनची मुंबई तिकीट १७८५० रूपये एवढी आहे. विशेष म्हणजे प्लाईटमध्ये अनेक सिट खाली राहत असल्याचा आरोप केल्या जात आहे. असे असताना मग या फ्लाईट मध्यं चढउताराचे तिकीट दर कशाला लावले जात आहे. काही दिवसा अगोदर नितीन मोहोड यांनी आरोप केला होता की हेतुपुरस्सपणे फ्लाईटाचे तिकीटाचे चढ्या दराने आकारले तर प्रवाशांची संख्ये कमी होईल आणि त्यानंतर हे कारण समोर करून विमासेवा बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# १,९२६ संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या':

## यावलकरांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मोर्शी–** तालुक्यातील १ हजार ९२६ संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस व वादळाचा फटका बसला आहे. त्या सर्वांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी मोर्शी -वरुडचे आ. उमेश यावलकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर आ. यावलकर यांनी फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी वरुड-मोर्शी तालुक्यातील १,९२६ संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मांडली. सन २०२३ मध्ये झालेली अतिवृष्टी व २०२४ मध्ये झालेली गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात आले होते. शासनाकडे त्याचा अहवालही पाठवण्यात आला होता, तरीदेखील अद्याप १,९२६ शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही.त्यामुळे या मुद्द्याकडे विशेष बाब म्हणून तातडीने लक्ष द्यावे व लवकरात लवकर नुकसान भरपाईपोटी अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वळती करावी, अशी मागणी आ. यावलकर यांनी फडणवीस यांच्याकडे केली आहे. याशिवाय मोर्शी मतदारसंघातील रखडलेल्या अनेक प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली असून, मुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण विषयाचे गांभीर्य लक्षात घेता लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही आ. यावलकर यांचे म्हणणे आहे.



# खून का बदला खून...! हत्येच्या गुन्ह्यात जामीनावर बाहेर आलेल्या आरोपी युवकाची हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४यवतमाळ –** वर्षभरापूर्वी कळंब चौक परिसरात गोळी झाडून एकाची हत्या झाली होती. या गुन्ह्यातील आरोपी पंधरा दिवसांपूर्वी जामीनावर कारागृहातून बाहेर आला. तेव्हापासूनच त्याच्यावर पाळत ठेवून खुनाचा बदल घेण्याचा प्रयत्न सुरू होता. मंगळवारी सायंकाळी संधी मिळताच, धारदार शस्त्राने वार करून त्या आरोपीची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे वर्दळीच्या चांदणी चौक परिसरात खळबळ उडाली.

मनीष सागर शेंद्रे (२५ रा.रमाई पार्क क्र. २ यवतमाळ) असे मृताचे नाव आहे. मनीषवर गोळी झाडून एकाचा खून केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यात तो जानेवारी २०२४ पासून कारागृहात होता. काही दिवसांपूर्वी तो जामिनावर बाहेर आला. त्यावेळी पोलिसांनी त्याला यवतमाळ शहरात राहू नको, तुझ्या जीवाला धोका आहे, अशी सूचना दिली होती. त्यानंतरही मनीष यवतमाळातच फिरत होता.

मंगळवारी मनीष त्याची दुचाकी दुरुस्त करण्यासाठी यवतमाळ वनपरिक्षेत्र कार्यालयासमोर असलेल्या मुन्नाच्या गॅरेजवर आला होता. त्याने तेथे दुचाकी दुरुस्तीला टाकली, याची



### पोलिसांची, बघ्यांची एकच गर्दी

खुनाच्या घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी जमली होती. मुख्य परिसरातील घटना असल्याने अपर पोलिस अधीक्षक पीयूष जगताप, एसडीपीओ दिनेश बैसाने, एलसीबी प्रमुख सतीश चवरे, शहर ठाणेदार रामकृष्ण जाधव, अवधूतवाडी ठाणेदार नरेश रणधीर यांनी घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावर भौतिक पुराव्यांचा शोध घेतला, तर दुसरीकडे सर्वच शोधपथक आरोपींच्या मागावर फिरत होते.

टीप पाळतीवर असलेल्या मारेकऱ्यांना मिळाली. त्यावरून मारेकरी याच परिसरात दबा धरून होते. दुचाकी घेण्यासाठी मनीष तेथे पोहोचला असता, चौघांनी त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला चढविला. मनीष शरीरावर अनेक घाव लागूनही त्यांच्या तावडीतून निसटला. मात्र, काही अंतर पुढे जाऊन आरएफओ कार्यालयाच्या फाटकासमोर कोसळला. त्यानंतर, पुन्हा हल्लेखोरांपैकी एकाने त्याच्यावर धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून तो ठार झाला की नाही, याची खात्री केली. नंतर हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले.

# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेची असंवेदनशीलता

## प्राथमिक शिक्षक समितीचे शिक्षण संचालक यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे द्वारा शिक्षकांचे वरीष्ठ व निवड श्रेणी चे प्रशिक्षण संपूर्ण महाराष्ट्रात २ जून ते १२ जून या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.त्या करिता रुपये २००० प्रत्येकी रजीष्ट्रेशन फीस घेण्यात आली आहे.प्रशिक्षणाची वेळ सकाळी ९.३० ते ५.३० म्हणजे एकूण ७ तासाची ही वेळ ठेवण्यात आली आहे.२००० एवढी फीस घेऊनही प्रशिक्षण स्थळी चहा,नाष्टा किंवा भोजनाची कुठलीही व्यवस्था प्रशिक्षण संस्थे द्वारे करण्यात आली नाही.प्रशिक्षण हे ९.३० वाजता सुरू होत असल्याने सर्व शिक्षक शिक्षिका यांना ९.१५ वाजता हजर होण्याचे आदेश आहेतअमरावती शहरातील प्रशिक्षण हे ज्ञानमाता आणि हॉलिक्रॉस हायस्कूल येथे आहे बरेच शिक्षक,शिक्षिका बाहेरगावाहून प्रशिक्षण घेण्यास आल्या आहेत,तर बऱ्याच लोकांचे घर हे बरेच दूर आहेत.बरेच प्रशिक्षणार्थी आटो-रिक्षा या साधनांनी प्रशिक्षण स्थळापर्यंत पोहचलेले आहेत. अमरावती जिल्हात चार ठिकाणी हे प्रशिक्षण सुरु झाले आहे.होलीक्रास व ज्ञानमाता हायस्कृल अमरावती,फातेमा हायस्कृल परतवाडा आणि आर.आर.लाहोटी हायस्कृल मोर्शी येथे जिल्हातील एकूण १७ वर्गातुन ७५६ शिक्षक,शिक्षिका हे प्रशिक्षण घेत आहे.प्रशिक्षण स्थळी पाणी,नास्ता,चहा याची सुविधा नाही आहे.




### प्रशिक्षण स्थळावर असणार्या अडीअडचणी सोडवा

संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षकांचे निवड व वरीष्ट श्रेणीचे प्रशिक्षण सुरु झाले आहे.पण डायट मार्फत हे प्रशिक्षण घेतल्या जात आहे.२जून पासून हे प्रशिक्षण सुरू झाले.पण पहील्याच दिवशी शिक्षक प्रशिक्षणार्थांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला.सकाळी लवकर प्रशिक्षण असल्यामुळे काही शिक्षकांना उशिर झाला म्हणुन गैरहजर दाखवले.प्रशिक्षणाच्या ठीकाणी आवश्यक सुविधा नाही.त्या बाबतीतचे निवेदन शिक्षक समितीने राज्य शिक्षण संचालक यांना निवेदन सादर करुन प्रशिक्षणात असणार्या त्रुटया दुरस्त करण्यात याव्या अशी मागणी केली आहे.

विजय कोंबे,राज्याध्यक्षमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

# पुरेसा जलसाठा असतानाही तांत्रिक कारणांमुळे पाणीटंचाईची स्थिती:नागरिक त्रस्त,

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अकोला–** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणात सध्या १६.८८ टक्के जलसाठा असूनही नागरिकांना दररोज पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. जुनाट पाइपलाइन, गळती, नियोजनशून्य वितरण आणि दुर्लक्ष व तांत्रिक कारणांमुळे अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा अनियमित झाला आहे. विशेषतः हद्दवाढ भाग, कौलखेड परिसर आणि निचऱ्याच्या भागांमध्ये दूषित पाण्याचा मोठा प्रश्न उभा ठाकला आहे.



सद्यःस्थितीत काटेपूर्णा धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत १ टक्का पाणीसाठा शिल्लक आहे, जो शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी पुरेसा आहे. तरीदेखील नळांमधून नियमित व शुद्ध पाणी मिळत नाही, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासनाने चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला असून, काही वेळा तोही दिवस पुढे ढकलण्यात येतो. अकोला शहराला मुबलक जलसाठा असूनही नागरिकांना पाणी मिळत नसेल, तर ही शुद्ध प्रशासनिक अपयशाची झलक आहे. महापालिकेने याकडे गांभीर्याने लक्ष देत तातडीने उपाययोजना न केल्यास नागरिकांचा आंदोलनांच्या रुपाने विरोध वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पावसाळ्याची सुरुवात, दूषीत पाणी टाळा;**

उकळून प्या सध्या पावसाला सुरुवात झाली असून, अशा काळात दूषित पाण्यामुळे रोगांची साथ फैलावण्याची शक्यता वाढते. नागरिकांनी पाणी उकळूनच प्यावे, असा इशारा वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आला आहे.

## जिल्ह्यात वाहतूक चालान दंड वसुली मोहिम

# पाच महिन्यात 3 कोटी ५५ लाख ७८,५०० रु. दंड वसुल

## वाहनधारकाविरूध्द १५० खटले न्यायालयात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** जिल्ह्यामधील वाहनधारकांकडे प्रलंबित ई-चलान दंडाचा भरणा करण्याकरीता ०१ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात आली होती. या विशेष मोहीमे दरम्यान मागील ई चालान अनपेड केसेस मध्ये २,६०,६०,१०० रुपये व नियमित केसेस मध्ये ९५,१८,४०० रु. असा एकुण ३,५५,७८,५०० रु. ईचलानदंडाचा भरणा करण्यात आला आहे. तसेच वाहनधारकां विरूध्द १५० खटले न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे..

विशेष मोहीम अंतर्गतई चालान दंड प्रलंबीतअसलेल्या वाहनधारकांचे रहिवासी पत्त्यावर नोटीस बजावून प्रलंबित दंडचा भरणा करण्याकरीता वाहतूक पोलिस अमलदारांचे पथक नेमण्यात आले आहे. या पथकामार्फत प्रलंबित ई चालान दंडचा भरणा करुन घेण्यात आला आहे. अमरावती ग्रामीण जिल्ह्यामध्ये विशेष मोहिमे दरम्यान मागील ई चालान अनपेड केसेस मध्ये २,६०, ६०,१०० रुपये आणिनियमित केसेस मध्ये ९५,१८,४००/-असा एकूण ३ कोटी ५५ लाख ७८ हजार ५०० रुपये चलान दंडाचा भरणा करण्यात आलेला आहे. हा वसुल ई चलान दंड ३,५५,७८,५०० रु. शासनाकडे जमाकरण्यात आलेला आहे. तसेच वाहनधारकांविरूध्द १५० खटले न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे. दंड न भरल्यास न्यायालयाचे परवानगीनेवाहन जप्त करण्याची मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. ही विशेष मोहीम ३० जून २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. या कालावधीत सुध्दा वाहन धारकांकडून प्रलंबित असलेल्या ई चलान दंडोचा भरणा



करण्यात येणार आहे. ज्या वाहनधारकानी प्रलंबित ई चालान दंडचा भरणा केला नाही. अशा वाहनधारकाविरूध्द न्यायालयातखटले दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. त्यानंतर न्यायालयाची परवानगी घेवून वाहन जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तरी दरम्यानचे काळात जास्तीत जास्त वाहनधारकांनी त्यांचे वाहनावरील प्रलंबित दंड भरूण घ्यावा व रितसर भरणा पावती घ्यावी. तसेच पुढील होणारी अप्रिय कार्यवाही टाळावी व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. असे वाहनधारकांना आवाहन करण्यात येत आहे. दंडाचा भरणा करण्याची प्रक्रीया उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. १)ऑनलाईन व्दारे https://mahatrafficechallan.gov.in या संकेत स्थळावर २) कोणत्याही वाहतुक अंमलदाराकडे ई चलान मशिन व्दारे ३) आपण ज्या ठिकाणी राहता त्या ठिकाणच्या कोणत्याही ट्रॉफीक अंमलदारांकडे ई चलान मशिन व्दारे सुविधा उपलब्ध आहे. जिल्हयातील सर्व नागरीकांनी जागरूकता बाळगून त्यांचे वाहनावरील प्रलंबीत ई-चालान दंड रक्कम शासन जमा करावी तसेच वाहतूक नियमांचे पालन करावे असे विशाल आनंद, पोलीस अधीक्षक, अमरावती यांचे कडुन नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

## सांत्वनपर भेट!





**अमरावती** भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपा आमदार श्रीकांत भारतीय आणि तुषार भारतीय यांच्या मातोश्री, तारा पंडितराव भारतीय यांचे नुकतेच निधन झाले. या दुःखद प्रसंगी अमरावती येथील श्रीकांतजींच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

# ६ जूनपर्यंत पावसाची उघडीप; मशागतीसाठी संधी

## आखाती देशातील उष्ण आणि कोरड्या वाऱ्यांचा मान्सूनला होतोय अडथळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –**जिल्ह्यात मे महिन्यात सरासरी २१.०४ मिलिमीटर पाऊस पडतो. परंतु यंदा प्रथमच मे महिन्यात पावसाने सरासरी ओलांडली आहे. मान्सूनपूर्व पावसाने मे महिन्याच्या सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. गत १५ दिवसांत पावसाने ३ दिवसांपासून विश्रांती घेतली. रविवारी दुपारी हलक्या पावसाचा शिडकावा वगळता तीन दिवस पावसाने उघडीप दिली.

आखाती देशातून येणारे उष्ण व कोरडे वारे महाराष्ट्रात वाहत आहेत. त्यांच्या प्रभावाने मान्सूनला अडथळा आला. त्यामुळे या आठवड्यात पाऊस उघडीप देणार असून शेतकऱ्यांनी मशागतीची कामे करावी, असे आवाहन हवामान अभ्यासक आशुतोष लाठकर यांनी केले आहे.सध्या तापमानात वाढ झाली आहे. ६ जूननंतर १२ जूनपर्यंत हलक्या पावसाची शक्यता आहे.मात्र हा पाऊस मर्यादित असेल. मात्र तत्काळ पेरणी करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. १२ जून नंतर पावसाची काय स्थिती असेल व मान्सून सक्रिय होईल की नाही, याचा अंदाज पुढील आठवड्यात कळेल. लवकरच बंगालच्या उपसागरात एक चक्राकार स्थिती निर्माण होईल, असा अंदाज असल्याचे हवामान खात्यांच्या वतीने सांगितले. आठवडाभर राज्यात दि. ३१ ते ६ जूनपर्यंत जोराचे वारे वाहणार असून या वाऱ्यांचा ताशी वेग जिल्ह्यात २४ ते २८ किमी ५ असेल.

राज्यात ७, ८,९, १० तारखेला भाग बदलत बदलत पाऊस पडेल. मात्र, राज्यात ६ जूनपर्यंत हवामान कोरडे असून वारे ९ वाहणार आहे. जिल्ह्यात ३ दिवस सूर्यदर्शन झाल्याने आता पाऊस उघडल्याची शेतकऱ्यांना खात्री पटली आहे. त्यामुळे शेत शिवारात मशागतीच्या कामांना गती येणार आहे.



अडीच लाख हेक्टरवर होणार सोयाबीनची पेरणी जिल्ह्यात प्रमुख नगदी पीक म्हणून सोयाबीन पीक घेतले जाते. यंदा शासनाने सोयाबीनला ५३२८ रुपयांचा हमीभाव जाहीर केला आहे. त्यात गतवर्षीपेक्षा ४३६ रुपयांची वाढ केली. त्यामुळे यावर्षी जिल्ह्यात २ लाख ६५ हजार हेक्टरवर सोयाबीनचा पेरा होणार आहे. कृषी विभागातर्फे जिल्ह्यात मार्गदर्शन सभा सुरू आहेत.

## येरला गावाजवळ झाडाला प्रेत लटकलेले आढळले

विदर्भ प्रजासत्ताकदि.४मोर्शीलगतच येरला गावाजवळ नाल्याच्या काठावरील झाडावर एका ५५ वर्षीय व्यक्तीचे प्रेत लटकलेल्या अवस्थेत दिसल्याने गावात एकच खळबळ उडाली. ही घटना मंगळवारी (ता. तीन) दुपारी ३:३० वाजता उघडकीस आली.पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोर्शी पोलीस स्टेशन अंतर्गत येरला येथील नाल्याच्या काठावरएका ५० ते ५५ वर्षीय अनोळखी युवकाचे प्रेत झाडावर गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याची माहिती येरलावाशीयांनी दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन युवकाचा मृतदेह झाडावरून खाली काढला. त्याचे अंगात हिरवट रंगाची फुल बाहीची बनियान व निळसर रंगाचा ट्रॅक पॅन्ट असल्याचे दिसून आले. या अनोळखी व्यक्तीबद्दल माहिती प्राप्त झाल्यास मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख ह्यांचे मो.क्र. ९९२३०४२५६५ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले

# 'एक दिवस मेळघाट'साठी : शाळा, अंगणवाडी दुरुस्तीस प्राधान्य: निधीची तरतूद, संबंधितांकडून सविस्तर अहवाल मागवला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –** मेळघाटमधील वास्तव जाणून घेतल्यानंतर जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांनी शाळा व अंगणवाडीच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. याशिवाय काही गावांना जोडणारे रस्ते, त्या गावांमध्ये नियमित न होणारा वीज पुरवठा आणि पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी त्या व्यक्तीशः चर्चा करून तोडगा काढणार आहेत.

'एक दिवस मेळघाटसाठी' हे अभियान राबवल्यानंतर सीईओंनी मंगळवारी धारणी आणि चिखलदरा पंचायत समितीच्या बीडीओंची ऑनलाइन बैठक घेतली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून त्याला मेळघाटच्या सुधारणांचा 'क्शन प्लॅन' असे नाव देण्यात आले आहे. सीइओ, अतिरिक्त सीइओ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह संपूर्ण यंत्रणेला गेल्या शुक्रवारी मेळघाट मुक्कामी नेले होते. रात्रभराच्या मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी सर्व ३६ अधिकाऱ्यांची चिखलदरा येथे त्यांनी बैठक घेतली. त्यातून प्रत्येक गावची काय अडचण आहे, हे लक्षात आले होते. त्याला अनुसरूनच मंगळवारच्या बैठकीत कृती कार्यक्रम निश्चित केला. मुक्कामानंतरच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या आढावा बैठकीत मेळघाटच्या दोन्ही तालुक्यातील शिक्षण, आरोग्य, घरकुल, पशुसंवर्धन, वनहक्क, वनउपजचा विनियोग यासह सरकारी लाभाच्या योजनांची स्थिती असे प्रमुख मुद्दे पुढे आले होते. शिवाय रस्ते, पुल, रपटे आणि शासकीय कार्यालयांच्या इमारतींची दुरुस्तीही चर्चेत होती. या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून निर्णय घेणे शक्य नव्हते. त्यामुळे दोन्ही तालुक्यांच्या बीडीओंनी एक सर्वंकष अहवाल तयार करावा आणि त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे ठरवण्यात आले होते. ही बैठक त्यासाठीच होती. एक दिवस मेळघाटसाठी अंतर्गत स्वत: सीईओ मेळघाटच्या चिखलदरा तालुक्यातील हतरु आरोग्य केंद्रांतर्गतच्या कुटीदा या अतिदुर्गम गावात मुक्कामी थांबल्या होत्या. या दरम्यान त्यांनी गावकऱ्यांची बैठक घेतली. बैठकीत गावच्या अडचणींसह तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणखी काय करता येईल, याचाही रोडमॅप तयार करण्यात आला होता.



जि. प. प्रशासनाच्या वेळा पत्रकानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रिती देशमुख ह्या काटकुंभ आरोग्य केंद्रांतर्गतच्या बिच्चूखेडा येथे, तर डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस हे सेमाडोह आरोग्य केंद्रांतर्गतच्या रेहट्याखेडा येथे आणि अभियंता दिनेश गायकवाड हे हतरु आरोग्य केंद्रांतर्गतच्या कुही गावात थांबले होते. बैठकीत ठरल्यानुसार नेमक्या कोणत्या शाळा आणि अंगणवाडीच्या इमारतींना दुरुस्तीची गरज आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या कोणत्या गावांमध्ये तीव्र झाली आहे. रस्ते कोणत्या गावांसाठी नाहीत आणि वीज पुरवठा अनियमित होत असलेली गावे कोणती आहेत, याचा सविस्तर अहवाल पाठवण्याचे निर्देश सीईओंनी दिले आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला प्रारंभ केला जाणार आहे. दरम्यान त्यासाठीच्या निधीची तरतूद करण्यासाठीही सीईओंनी स्वतंत्र तयारी सुरू केली आहे.

# अमरावतीत एमएस-सेट परीक्षेची तयारी

## १५ जूनला २७ केंद्रांवर ९ हजार ६९६ विद्यार्थी देणार परीक्षा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणारी आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभाग द्वारा संचालित केली जाणारी एम.एस.-सेट-२०२५ परीक्षा आगामी १५ जून रोजी ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी शहरात एकूण २७ केंद्र राहणार असून या केंद्रांवरुन ९ हजार ६९६ विद्यार्थी परीक्षा देण्यात आहेत.

अमरावती विद्यापीठाने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार अमरावती शहरातील विद्याभारती महाविद्यालय, विद्याभारती कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, सी.के. नायडू मार्ग, कॅम्प अमरावती, गोल्डन किड्स इंग्लिश प्रायमरी स्कुल, कॅम्प, शिवाजीनगर, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, मोर्शी रोड अमरावती आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी रोड, अमरावती येथे ही परीक्षा होईल.

याशिवाय शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (भाषा भवन), पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, विंग ए मुख्य इमारत, विंग बी कॉम्प्युटर अँड एआय अँड डीएस इमारत, विंग सी इलेक्ट्रिकल इमारत, विंग डी सिव्हील अँड मेकॅनिकल इमारत, न्यू हायस्कूल मेन, जोग चौक, नुतन कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जोग चौक तसेच महिला महाविद्यालय, जोग चौक, अमरावती येथेही ही परीक्षा घेतली जाणार आहे.


हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अंबादेवी रोड, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, दसरा मैदान रोड, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, ब्लॉक बी, ब्लॉक डी, बडनेरा रोड, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, एफवायबीई अँड सिव्हील बिल्डींग, सी.एस.ई. बिल्डिंग, बडनेरा रोड, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (आयओटी) एआय अँड डीएस प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, ब्लॉक ए, ब्लॉक बी., ब्लॉक सी, ब्लॉक डी, ब्लॉक ई अंजनगांव बारी रोड अमरावती, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, एम.सी.व्ही.सी. इमारत आणि मुख्य इमारत, मोर्शी रोड अशा एकूण २७ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे.

### दिव्यांगांसाठी देखील विशेष सोय

दिव्यांग विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी परीक्षेच्या तीन दिवस आधी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर विधी विभागाच्या प्राध्यापक व एम.एस.-सेट परीक्षेच्या समन्वयक डॉ. कल्पना जावळे यांच्याशी ९४२००३४३८५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

# प्रभाग रचनेसाठी सर्वांचे डोळे शासन आदेशाकडे

## इच्छुकांची फिल्डिंग; राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

प्रभाग रचना २०१७ च्या म्नपा निवडणुकीप्रमाणे करायची की, शासन याबाबत नव्याने आदेश जारी करणार याची प्रतीक्षा असताना शासनाने अद्याप कोणताही आदेश काढला नसल्याने सर्वांचे लक्ष एकदा आदेश केव्हा घडकतो याकडे लागले आहे. प्रभाग रचनेची निश्चिती झाली की, झाडून सर्वच राजकीय पक्ष, इच्छुक आणि अपक्ष असे सर्वच कामाला लागण्यास मोकळे होतील. परंतु, आज निघेल, उद्या निघेल म्हणता, म्हणता एक आठवडा निघून गेला तरी अद्याप आदेश काही धडकला नाही.

### मनपा निवडणूक दिवाळी आधी की नंतर

मनपा निवडणूक दिवाळी आधी की नंतर होणार याचीच उत्सुकता लागली आहे. बहुतेक जण २०१७च्या निवडणुकीप्रमाणेच चार सदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार निवडणूक होणार अशी अपेक्षा बाळगून आहेत. अर्थात २२ प्रभागातील ८७ नगरसेवक मनपात यावेळीही राहतील. केवळ एका लोकसंख्येने लहान असलेल्या प्रभागात तीन नगरसेवक निवडून येतील. यात ओबीसीच्या २३ जागा राहतील. त्यातही १२ जागा या महिलांच्या वाट्याला येतील, अशी प्रभागरचना निश्चित होण्याच्या आधीची स्थिती आहे. हीच प्रभाग रचना कायम राहिल्या बदलणार नाही. परंतु, बदल झाला तरच बदल त असे मत राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले.

शासनाला पावसाळ्यात मनपा असो किंवा अन्य कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायच्या नाहीत, हेच यातून स्पष्ट होत आहे. नव्याने जनगणना झाली नसली तरी सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार निवडणुका घ्याव्याच लागणार आहेत. त्या दिवाळीनंतर घेण्याचा राज्य शासनाचा या चालढकलीतून प्रयत्न दिसत आहे. विद्यमान राज्य सरकारला विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाले. यात भाजप, पार्टी अजित पवार गट अशी तीन पक्षांसह इतर घटक पक्षांच्या या के सरकारमध्ये प्रत्येकच पक्ष स्वबळावर मनपा निवडणूक लढण्याची तयारी चालवली असून प्रत्येकाने मोर्चे बांधणीही सुरू केली आहे. युतीधर्म किंवा आघाडी धर्म पाळायचा नाही अशीच भाषा सध्या राजकीय पक्षांचे स्थानिक नेते वापरत आहेत. त्यामुळेच खरी उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कोण कोणते उमेदवार रिंगणात आणणार. ऐनवेळी कोण कुठे पळणार याबाबत प्रभाग रचनेची निश्चिती झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

# अमरावती पोलिस बोगस बियाण्यांचा शोध घेण्यासाठी जाणार गुजरातला

## कृषी विभागाने दोन दिवसांपूर्वी पकडले होते २५ लाखांचे एचटीबीटी बियाणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

देन दिवसांपूर्वी कृषी विभागाने शहरातील वेलकम पॉइंटवर अहमदाबादहून अमरावतीमार्गे नागपुरात जाणारे अडीच हजार पॅकेट अनधिकृत एचटीबीटी बियाणे पकडले आहे. या प्रकरणात गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी गाडगेनगर पोलिस गुजरातमध्ये जाणार आहेत.शहर व जिल्ह्यात आतापर्यंत



कृषी विभागाने अनधिकृत एचटीबीटीच्या सात कारवाया केल्या आहेत.त्यापैकी सहा ठिकाणी जप्त केलेले अनधिकृत एचटीबीटी बियाणे हे गुजरातमधून आल्याचे समोर आले. यावरून गुजरातमधील अहमदाबाद व अन्य काही ठिकाणांहून अनधिकृत एचटीबीटीचा पुरवठा होत असल्याचे प्राथमिकरित्या समोर आले. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात पुरवठा कसाहेत आहे, त्याचा मुख्य सूत्रधार कोण यासह अन्य काही महत्त्वाचे प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहेत. त्यामुळेच आता गाडगेनगर पोलिसांनी तपासासाठी गुजरातला जाण्याचा निर्णय घेतला आहे.पोलिस लवकर गुजरातला गेल्यास मुख्य सूत्रधार किंवा गुजरातमधून अमरावतीत पुरवठा करणारा सापडू शकतो. दरम्यान या तपासासाठी गुजरातला आम्ही जाणार आहे, त्यासाठी वरिष्ठांकडे परवानगी मागितली असल्याचे गाडगे नगरचे प्रभारी ठाणेदार दिनेश दहातोंडे यांनी सांगितले आहे.

### सखोल तपास होणार

अनधिकृत एचटीबीटी बियाण्यांचा आम्ही सखोल तपास करणार आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे.

**– सागर पाटील,**
**पोलिस उपायुक्त.**

# राजुरा येथील उद्याचा गुरे, बकरी बाजार बंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ शेंदुरजनाघाट**

महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ ची अंमलबजावणी म्हणून गुरुवार, ५ जून रोजी राजुरा बाजार येथील गुरांचा व बकरी बाजार बंद ठेवला जाणार आहे. महाराष्ट्र गो सेवा आयोग पुणे यांनी पत्राद्वारे कृषी उत्पन्न बाजार समितीला तसे कळवले आहे.

येथील पोलिस स्टेशननेही बाजार समितीला पत्र देऊन बाजार बंद ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. क्रूड कृषी उत्पन्न बाजार समितीची उपबाजारपेठ राजुरा बाजार येथे आहे. येथे दर गुरुवारी गुरांचा व बकऱ्यांचा बाजार भरतो. त्यामध्ये शेळी, मेंढी व इतर गुरे विक्रीसाठी आणली जातात. परंतु कायद्याने ५ जून रोजी तसे करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे खरेदी व विक्री करणाऱ्या सर्व शेतकरी, व्यापारी तसेच संबंधित घटकांना सूचित करण्यात आले असून, ५ जून रोजी भरणारा गुरांचा बाजार कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली बंद ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे या दिवशी कोणीही आपली जनावरे विक्रीस आणू नये, असे सांगतानाच पुढील गुरुवारी भरणारा गुरांचा बाजार १२ जून रोजी नियमित भरेल यांची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर तसेच सर्व संचालक आणि सचिव नंदकिशोर बोडखे यांनी केले आहे.

### जिल्ह्यात आठ ठिकाणी उभारले तपासणी नाके

येत्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोवंशाची तस्करी होऊ नये, यासाठी जिल्ह्यात आठ ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहे. गोवंशाची वाहतूक होऊ नये, यासाठी परिवहन विभागानेही दक्ष राहावे. तसेच गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे पोलिसांतर्फे कळवण्यात आले आहे.

# माता रुख्मीणीच्या पालखीचे सुनिल राणा यांनी युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांसोबत केले स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

नेहमी सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असणारी युवा स्वाभिमान पार्टी समाजकारणासोबतच अध्यात्मीकतेमध्ये सुद्धा पुढाकार घेवून धर्माचे पालन करीत असल्याचे नेहमीच निदर्शनास येते. दरवर्षी प्रमाणे आषाढी एकादशी निमित्त अमरावती जिल्ह्यातुन विविध गावातुन विविध संस्थेच्या व मंदिराच्या पालख्या पैदल वारी करुन विठ्ठलाचे दर्शन घेण्याकरिता जात असतात. त्या अनुषंगाने माता रुख्मीणीचे माहेर असलेले कौंडण्यपुर येथुन सुद्धा शेकडो वारकऱ्यांना घेवून माता रुख्मीणीच्या पालकीसह पंढरपुरला निघाले असता या पालखीचे राजापेठ चौक येथे युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह सर्वप्रथम पालखीचे पुजन करुन दर्शन घेतले व स्वागत केले. तसेच पालखीमध्ये सहभागी असलेल्या एका जेष्ठ वयोवृद्ध महिलेसोबत फुगडी खेळुन फुगडीचा आनंद सुद्धा घेतला तसेच आ.रवि राणा व मा.खा.नवनित राणा व समस्त युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने शेतकरी, शेतमजुरांच्या तसेच सर्व सामान्य जनतेच्या जीवनात सुख समृद्धी नांदो याकरिता माता रुख्मीणी व पांडुरंगाला प्रार्थना सुद्धा केली. यावेळी कमलकिशोर मालानी, प्रा.अजय गाडे, मंगेश पाटील, ज्योती सैरिसे, सुमती ढोके, राजा बागडे, चंदा लांडे, अर्चना तालन, सचिन भेंडे, धर्मेंद्र मेहरे, श्याम कथे, अशोक पांडे, अवी काळे, गजानन बोंडे, अन्ना कुंभलकार, राजु अंबाडकर, सुरज मिश्रा, दिपक खटाळे, श्रीकृष्ण बैलमारे, दिलीप भाकरे, संतोष गवळी, पोकळे गुरुजी, अनिल शुक्ला, शालीनी देवरे, वंदना जामनेकर, कल्पना शर्मा, राजु कोरडे, अमृत मुथा, शर्मिला मिश्रा, किरण पोकळे, तुषार दुधे, सुधिर लवणकर, अजय बोबडे, आकाश राजगुरे, राजेश दातखोरे, आनंद भोयर, हिरपुरक, प्रयास चऱ्हाटे, संकेत गादे, मोहन जोशी व असंख्य युवा स्वाभिमान पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापालिकेचे मान्सुनपुर्व कामे युद्ध स्तरावर

## नाल्यात कचरा टाकणाऱ्यांवर होणार कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती महानगरपालिका द्वारे मान्सुनपुर्व तयारीचा अनुषंगाने पावसाळ्यात आपत्ती घडू नये यासाठी शहरातील १८ मोठे व लहान २२ नालेसफाई चे कामे व झोन स्तरावर असलेले कच्चे नाले / नाल्या सुद्धा साफ करण्याचे कामे माहे मार्च पासून सुरू करण्यात आली आहेत. काही ठिकाणी मनुष्यबळाद्वारे सुद्धा नाले सफाईची कामे सुरू आहेत, सद्यस्थितीत ८५% टक्के नाले सफाईचे काम पूर्ण झाले आहेत. मा.आयुक्त सचिन कलंत्रे, मा.अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त प्रशासन डॉ.मेघना वासनकर यांचे द्वारा नियमित नाले सफाईचे कामांची तपासणी सुरू आहेत व पाचही झोनचे सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत सुद्धा नाले सफाईचे कामांचे स्थळ तपासणी सुरू आहे.

हवामान खात्याने राज्यात यावर्षी किमान सरासरी इतका किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. पावसाच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मनपाच्या सर्व यंत्रणांनी सज्ज असणे गरजेचे आहे. पावसाळ्यात आपत्तीच्या काळात सर्व संबंधीत मनपा यंत्रणांनी समन्वयाने काम करावे असे मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सांगितले. तसेच नालेसफाईची कामे पारदर्शक होण्याचे दृष्टीने व नागरिकांना याबाबतची संपूर्ण माहिती मिळण्याचे अनुषंगाने दैनंदिन नाले सफाईचे कामे मनपाचे वेबसाईटवर सुद्धा अपलोड करण्यात आली आहे, तसेच मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांनी नागरिकांना आव्हान केले आहे की, नाल्यांच्या पाण्याचा प्रवाहास अडचण निर्माण होणारे कचरा, जुने भंगार साहित्य टाकू नये. अमरावती महानगरपालिकेतर्फे नाले साफ सफाई झाल्यावरही बरेच हॉकर्स, व्यावसायीक व नागरिक नाल्यामध्ये कचरा टाकत आहे. सदर बाबींमुळे पुरसदृश्य स्थिती निर्माण होवून हानी होण्याची शक्यता असते त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून नाल्यात कचरा टाकणा-यांवर अटकाव करणे अत्यंत महत्वाचे आहे.

# युवा वाणी वरून गाजणार क्षमताचा आवाज : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

## मुंबई आकाशवाणी वरून होणार संपूर्ण राज्यात प्रसारित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सामाजिक आणि पर्यावरणाच्या कार्यात सदैव समर्पित राहणारी १० वी ची विद्यार्थिनी कु. क्षमता संतोष ठाकूर हिची मागील आठवड्यात नागपूर आकाशवाणी केंद्र द्वारे पर्यावरण या विषयावर ' युवा वाणी ' या लोकप्रिय सदरा करिता मुलाखत घेण्यात आली. ज्याचे प्रसारण जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मुंबई आकाशवाणी केंद्र द्वारे दिनांक ५ जून रोजी सायंकाळी ५:३० ला संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात येणार आहे.

राजनंदिनी स्मृती फाउंडेशन महाराष्ट्र या नावाखाली मागील काही वर्षापासून क्षमता पर्यावरणाच्या क्षेत्रात भरीव कार्य करत आहे, ज्यात प्रामुख्याने प्लास्टिक मुक्त परिसर- प्लास्टिक मुक्त देश या संकल्पनेवर, जिथे लाखो लोक धार्मिक कार्यक्रमाकरिता एकत्रित येतात तेथे जाऊन त्यांना प्लास्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम सांगून आपण केलेल्या कचऱ्याला आपणच कसे संकलित करावे हे सांगीतले जाते, प्रसिद्ध शिवमहापुराण कथा वाचक पंडित प्रदीप जी मिश्रा महाराज यांच्या प्रत्येक शिव महापुराण कथेत जाऊन तसेच प्रयागराज येथील महा कुंभात




जाऊन लाखो भाविकांमध्ये जागृती केल्या गेली ज्या मुळे परिसर स्वच्छ ठेवण्यात मदत झाली, वाढत्या तापमानाला लक्षात घेत मागील वर्षी सर्वांच्या मदतीने एक लक्ष सीड बॉल तयार करून आषाढी एकादशी निमित्त पुण्यात जाऊन वारकऱ्यांना निशुल्क वितरित केले, जे त्यांनी पंढरपूर कडे पाई जातांना दिवे घाट मार्गाने लावले. धार्मिक कार्याकरिता जमलेल्या लाखो भाविकांना पर्यावरणाचा संदेश देणे हा यामागील मुख्य हेतू होता, पर्यावरण पूरक गणेशा- २०२४ या उपक्रमा अंतर्गत मातीची श्री गणेशाची मूर्ती घरी स्थापित करून ती आपल्याच घरी विसर्जित करणाऱ्या जिल्ह्यातील ३२,००० विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केल्या गेले,आतापर्यंत दोन हजार पेक्षा जास्त वृक्ष स्वतः लावून पाच हजार रोपे इतर विद्यार्थ्यांना देण्यात आली या प्रकारे सातत्याने कार्य सुरू आहेत.पर्यावरणीय कार्यात विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे करिता क्षमताला सातत्याने आकाशवाणी द्वारे आमंत्रित केले जात आहे, विविध जिल्ह्यातून आतापर्यंत पाच मुलाखती व त्यांचे १२ वेळा प्रसारण झालेले आहे, नागपूर आकाशवाणी च्या उद्घोषिका स्वर्णिमा यांनी खूप सुंदर प्रकारे क्षमता सोबत संवाद साधला, सहायक निदेशक विलास पराते, सहायक निदेशक प्रियदर्शनी राऊत, सतीश रेवे इत्यादींचा सहभाग मिळाला आणि सर्वांनी कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

# आयपीएल सट्ट्यावर धाड; अमरावतीत चौघे ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

यंदाच्या आयपीएल हंगामातील शेवटचा सामना मंगळवारी ३ जूनला रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास संपला. याचदरम्यान शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट एकने रविनगरातील एका घरात सुरू असलेल्या ऑनलाइन सट्ट्यावर धाड टाकली. ही यंदाच्या आयपीएल हंगामातील शहर पोलिसांकडून झालेली शहरातील पहिलीच कारवाई ठरली. रात्री बारा वाजेपर्यंत पोलिसांची कारवाई सुरू होती. यावेळी पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून ३९ हजारांची रोख जप्त केली आहे.पोलिस आयुक्त अरविंद चावरिया रुजू झाल्यानंतर शहर पोलिसांनी कारवाईंचा धडाका सुरू केला. यातच ३ जूनला आयपीएलचा अंतिम सामना होता. मंगळवारी रात्री आरसीबी विरुद्ध पंजाब सामन्यावर सट्टा खेळला जात असल्याची माहिती मिळताच युनिट एकचे पीआय गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे व पथकाने रविनगर भागात एका घरातील वरच्या माळ्यावर सुरू असलेल्या सट्टचावर धाड टाकली आहे. या ठिकाणाहून पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले असून या बुकींचे कनेक्शन शहराबाहेर कुठे आहे, हे सुध्दा पोलिस तपासणार आहे.

# पावसाने घेतली विश्रांती शेतकऱ्यांची चिंता वाढली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

यंदा निसर्गचक्रात बदल झाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातच नव्हे तर, अख्ख्या महाराष्ट्रातच मे हिटमध्येच अवकाळी पावसाने थैमान घातले. या पावसाने उन्हाळी कांदा पीक उत्पादक घेणाऱ्या शेतकऱ्यांची दाणादाण उडविली. वादळी व अवकाळी पावसाने विश्रांती घेतल्याने शेती कामाला वेग आला खरा, मात्र पावसाने अशीच उघडीप दिली तर, मृग नक्षत्रामध्ये पेरणी होईल की नाही? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.मे महिन्यात जिल्ह्यात वादळ वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. पावसाची ही दमदार हजेरी पाहता काहीशेतकऱ्यांनी मशागतीच्या कामालाही सुरुवात केली, तर काहींनी वेगवेगळे पावसाचे अंदाज पाहता जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन पेरणीचे नियोजनही केले होते. अशातच, शुक्रवार ते सोमवार असे चार दिवस दुपारी कडक ऊन तापू लागत असल्याचे चित्र आहे.जिल्ह्यात या चार दिवसात पावसाची कुठेही हजेरी लागली नाही. पावसाने उसंत घेतल्याचे लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी शिल्लक राहिलेल्या शेती कामांना सुरुवात केली आहे. वादळ वाऱ्यामुळे ज्यांचे नुकसान झाले, त्यांनी दुरुस्तीच्या कामाला प्रारंभ केल्याचे दिसत आहे.



## मान्सूनपूर्व शेती मशागतीला वेग

शेतकऱ्यांनी मशागतीच्या कामाला वेग आला आहे. बि-बियाणे कुठले खरेदी करावे, यासंबंधी शेतकरी कृषी विक्रेत्यांकडे जाऊन विचारपूस करीत आहेत. एकाचवेळी शेतशिवारातील अनेक कामे सुरू झाल्याने मशागत करणाऱ्या वाहन चालकांचे दर वाढले आहे. उन्हाळी पिकांची काढणी करण्यासोबतच खरीप हंगामात रान पेरणीसाठी तयार करताना शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## साहित्याची जुळवाजुळव

खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेती उपयोगी अवजारांची दुरुस्ती करण्याची धावपळ सुरू आहे. नांगर, वखर, फण, पट्टा, कासरे, फास व त्याला लागणारे नाड, चाळी यासह बि-बियाणे, खत आदी विविध साहित्यांचे जुळवाजुळव करण्यात शेतकरी गुंतला आहे. त्याचबरोबर मोडलेले साहित्य दुरुस्ती करण्याची लगबग सुद्धा जोमात सुरू आहे. यासोबतच, गुराढोरांसाठी वैरणाची सोय करण्यावरही भर दिला जात आहे.


# गुरुकुलचा प्रभावी ठसा; जेईई आणि सीईटी परीक्षेत विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

## आर्यन, सर्वम, गोपेश, अर्णव डव्हान्स यांची जेईई ॲडव्हान्स मध्ये घवघवीत कामगिरी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

शिक्षण क्षेत्रात सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या गुरुकुलच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. गुरुकुलच्या संपूर्ण परीक्षाभिमुख प्रशिक्षणाचा प्रभाव इतका ठळकपणे जाणवला की यंदाच्या जेईई मेन परीक्षेत एकूण ७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून, त्यापैकी ४ विद्यार्थीनी जेईई ॲडव्हान्स मध्ये संपूर्ण भारतातून उत्कृष्ट रँक प्राप्त केलेली आहे यापैकी आर्यन पांडे याने ८७३ रँक मिळवून सर्वोत्तम गुणांसह यादीत आघाडी घेतली आहे. त्याच्याच पाठोपाठ सर्वम मुळे २३१८, गोपेश इंगळे - ५३६९आणि अर्णव कावरे ९८१३ रँक घेऊन या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामध्ये , श्री आलोक ठाकूर सरांचे वैयक्तिक मार्गदर्शन, वेळेचे नियोजन, स्ट्रॅटेजिक ॲप्रोच व परीक्षेपूर्वीचे सखोल विश्लेषण या घटकांचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांना जेईईच्या वास्तविक परीक्षा अनुभवासारखाच सराव करून घेतल्याने त्यांचा आत्मविश्वास आणि तयारीची पातळी अधिक बळकट झाली, असे निरीक्षण पालकांनी व शिक्षणतज्ज्ञांनी नमूद केले.फक्त जेईई नव्हे, तर सीईटी परीक्षेतही गुरुकुलचे विद्यार्थी उजळले असून, त्यांचे गुणविश्लेषण पाहता अनेक विद्यार्थ्यांनी गुणतालिकेत अधिक गुण मिळवतील. सीईटीमध्ये संस्थेचा निकाल सरासरीच्या मानाने खूपच उजवा ठरनार आहे. संस्थेचे संचालक अलोककुमार ठाकूर यांनी सांगितले की, आमचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास नको, तर स्पर्धेच्या परीक्षांची मानसिक आणि तांत्रिक तयारी करून देणे आहे. आम्ही करून घेतलेली तयारी म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका नव्हे, तर त्या मागची रणनीती, अचूक विश्लेषण विद्यार्थ्यांना अतिशय महत्वकांक्षी ठरत आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना त्यांच्या पालकांनीही गुरुकुल च्या अभ्यासपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले. संस्थेच्या अशा अभ्यासपूर्ण प्रयत्नांमुळे अमरावतीसारख्या शहरातही जेईई व सीईटीसारख्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना उंच भरारी घेता येते, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.



### वे टेस्ट सिरीज चा खूप फायदा झाला

जेईई चा अभ्यास करताना व जेईई परीक्षेला समोर जाताना वे एज्युकेशन इनेसिटीव्हनी संशोधनात्मक घेतलेल्या टेस्ट सिरीजचा मला अभ्यासात व अभ्यासाचा ताण सहन करण्यात फार मोठा मोलाचा वाटा आहे, यामुळे मला अधिका अधिक प्रश्नांचा सराव करता आला त्यामुळेच मला हे घवघवीत यश मिळाले आहे.

**आर्यन पांडे परीक्षार्थी.**

# दिव्यांगांना रेल्वे तिकिट क्यूआर कोडद्वारे मिळणार; प्रमाणपत्र बाळगण्याची गरज नाही

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

अपंगांना रेल्वेने प्रवास सवलत घेण्यासाठी रांगेत लागून किंवा रेल्वे कार्यालयात जाऊन प्रक्रिया करण्याची गरज आता पडणार नाही. रेल्वे त्यांना डिजिटल ओळखपत्र देणार आहे.

प्रवासी अपंगांना शारीरिक प्रमाणपत्र नेहमी द्यावे लागत होते. डिजिटल ओळखपत्रामुळे त्यांचा हा जास थांबेल. रेल्वेने सवलतीसाठी वापरल्या जाणाऱ्या ओळखपत्र प्रणालीचे संपूर्ण डिजिटायझेशन केले आहे. या डिजिटल ओळखपत्रात क्यूआर कोड असेल. तो इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) च्या ऑनलाइन बुकिंग प्रणालीत तसेच काउंटरवर तिकीट आरक्षणासाठी स्कॅन करता येईल. यामुळे अपंग प्रवाशांना वारंवार कागदपत्रे सादर करावी लागणार नाही.

रेल्वेच्या नव्या प्लॅटफॉर्मवर अपंग स्वतःहून ऑनलाइन अर्ज व नूतनीकरण करू शकतात. या ओळखपत्रात एकदा माहिती भरल्यानंतर ते छेडछाड प्रतिरोधक व कायमस्वरूपी डिजिटल स्वरूपात वापरता येईल. याचा रेल्वेच्या डिजिटलमधील सेवेत समावेश आहे. लाखो अपंग प्रवाशांचा प्रवास सोयीचा होणार असून अधिकृत वेबसाईटवर दिव्यांगांना सोय उपलब्ध करून दिल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली. सवलत प्रमाणपत्र बाळगण्याची गरज नाही. ऑनलाइन पडताळणी व वेगवान प्रक्रिया केली जाईल. पारदर्शक व सुरक्षित ओळख प्रणाली आहे. क्यूआर कोडद्वारे सोयीस्कर वापर होणार आहे.

अपंगांसाठी रेल्वेने ही एक चांगली सुविधा सुरू केली आहे. नागपूर विभागात दिव्यांगांच्या अर्जावर १०० टक्के डिजिटल ओळखपत्र वितरित ल करण्याचे काम सुरू आहे. याद्वारे गैाकारालाही आळा बसेल, असे मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल म्हणाले.



# बियाण्याची मोफत किट हवी, कुठे साधणार संपर्क? अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडणार : फार्मर आयडी आवश्यकच

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनायावर्षीच्या खरीप हंगामात बियाण्याची मोफत किट दिली जाणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना कृषी सहायकांकडे अर्ज सादर करावा लागणार आहे. यामध्ये अलीकडील काळात विकसित झालेले बियाणे दिले जाणार आहे. या पिकांच्या उत्पादन वाढीची जबाबदारी पूर्णतः शेतकऱ्यांनाच घ्यावी लागणार आहे.

सोयाबीनच्या पाठोपाठ तुरीचे मोफत बियाणे कृषी विभागाकडून वितरित केले जाणार आहे. या बियाण्याच्या मोफत किटसाठी शेतकऱ्यांना तालुका कृषी विभागाच्या कार्यालयात अर्ज सादर करावा लागणार आहे. प्रत्येक तालुक्याला बियाणे वितरित करण्यासाठी काही लक्षांक देण्यात आले आहे. लक्षांकापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे अर्ज केल्यास शेतकऱ्यांच्या निवडीसाठी ईश्वरचिठ्ठी काढली जाणार आहे. यानंतरच शेतकऱ्यांची निवड केली जाणार आहे. जिल्ह्यातील १०१२ मिनी किट वितरित केल्या जाणार आहेत. त्या दृष्टीने संपूर्ण नियोजन कृषी विभागाने तयार केले आहे.



## निवडीसाठीचे निकष

तुरीची मिनी किट देताना शेतकऱ्यांसाठी काही निकष जाहीर करण्यात आले आहे. अर्ज करताना शेतकऱ्यांना अर्जासोबत सातबारा जोडावा लागणार आहे. यासोबतच फार्मर आयडी लागणार आहे. इतकेच नव्हे तर आधारकार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. अल्पभूधारक, विधवा, परितक्त्या महिला, अनुसूचित जाती, जमाती शेतकरी, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मिनी किट देण्याच्या सूचना आहेत.

## तर पुढील दोन वर्षे त्या पिकाची किट मिळणार नाही

किट वितरित करताना यावर्षी ज्या बियाण्याची किट शेतकऱ्याला वितरित झाली. त्या बियाण्याची किट मिळविण्यासाठी पुढील दोन वर्षे अशा शेतकऱ्यांना अर्जच न घेण्याच्या सूचना कृषी विभागाला मिळाल्या. यावर्षी ज्या शेतकऱ्यांनी तुरीचे बियाणे मिळविले त्या शेतकऱ्यांना पुढील दोन वर्षे या मिनी किटसाठी अर्ज करता येणार नाही.

# नारळाचे उत्पादन अर्ध्यावर, खोबर ३०० रुपयांवर; नारळामध्येही ३०० ते ५०० रूपयांनी झाली वाढ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

यावर्षी नारळाचे उत्पादन अर्ध्यावर आले असल्याने खोबऱ्याचे भाव ३०० रुपये प्रती किलोवर पोहोचले आहेत. खोबरा काळा व लाल याच्या भावात दीडपटीने वाढ झाली आहे. एक महिन्यापूर्वी २०० रुपये किलो असणारा खोबरा २६० ते ३०० रुपये किलोवर पोहोचला आहे, तर नारळामध्ये सुद्धा ३०० ते ५०० रुपयांनी वाढ झाली आहे. दीड हजार रुपये प्रती बोरी मिळणारा नारळ दोन हजार रुपयांवर पोहोचला आहे. खोबरे व नारळाच्या भावात वाढ झाल्याने खोबरा खीस, खोबरा तेल, खोबऱ्यापासून बनणाऱ्या सर्व वस्तूंची भाव वाढ झाली आहे. दक्षिण भारतात खोबऱ्याचे तेल खाण्यामध्ये वापरल्या जाते. खोबऱ्याच्या तेलामध्ये प्रतिकिलो १०० रुपये वाढ झाली आहे.

यावर्षी तांदळाचे उत्पादन चांगलेझाल्याने तांदळाचे भाव मागील वर्षपिक्षा कमी आहे. चिन्नोर कालिमुछ सात हजार ५०० ते आठ हजार रुपये प्रती क्विंटल विकल्या जात आहे. चिन्नोर कालिमुछचे उत्पादन यावर्षी कमी असल्याचे बोलले जाते. जय श्रीराम कोलम पाच हजार ५०० रुपये,



आर.एन.आर. पाच हजार रुपये, एचएमटी चार हजार ५०० रुपये, बीपीटी चार हजार रुपये, असा भाव आहे. यावर्षी गव्हाचे उत्पादनही चांगले झाल्याने गव्हाच्या भावातही मंदी दिसून येत आहे. मागील वर्षी तीन हजार ८०० रुपये असणारा गहू यावर्षी तीन हजार ३०० रुपये प्रति क्विंटल विकला जात आहे. तीन हजार ५०० असणारा गहू तीन हजार प्रती क्विंटल दराने विकल्या जात आहे. सोयाबीन तेलामध्येसुद्धा मंदी असल्याचे दिसून येते.

### तुरडाळीच्या भावात घसरण

दिवाळीच्या दरम्यान १५९ ते १६० रुपये असणारी तुरीची डाळ १०० ते ११० रुपयांपर्यंत उतरली आहे. हरभरा डाळीच्या भावातही घसरण झाली आहे.हरभरा डाळ ७० ते ७५ रुपये किलो बाजारात विकल्या जात आहे. मूग डाळ ११० ते १२० रुपये किलो बाजारात विकल्या जात आहे. मसूर डाळ ८० रुपये किलो, चणा ६५ ते ७० रुपये किलो दराने विकल्या जात आहे.सहा महिन्यांपूर्वी दोन हजार १०० रुपये असणारा सोयाबीन तेलाचा पिंप एक हजार २०० रुपयांत विकला जात आहे. यामुळे पामतेल व सूर्यफुल तेलाचे भावसुद्धा कमी झाले आहेत. त्यामुळे दिलासा मिळाला आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढा; ८ जूनपासून बच्चू कडू बसणार बेमुदत उपोषणाला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

शेतकरी, शेतमजूर व दिव्यांग यांच्या असलेल्या प्रश्नांकडे सरकार लक्ष देत नाही. या विरोधात प्रहार संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार बच्चू कडून यांनी आंदोलन पुकारले आहे. येत्या ८ जुनपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. गुरुकुंज मोझरी येथे कार्यकर्त्यांसह उपोषणाला बसणार असल्याची माहिती बच्चू कडून यांनी बोलताना दिली आहे.

राज्य सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या विचारात नाही. शिवाय शेतकऱ्यांच्या अन्य प्रश्नांसह दिव्यांग व विधवा महिलांचे मानधन आदी प्रश्न मांडण्यासाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू हे ८ जूनपासून अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग उपोषण करणार आहेत. याबाबत त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना आपली भूमिका मांडत सरकारला अल्टिमेटम देखील दिला आहे.



दरम्यान शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी करा, दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन द्या, मनरेगा वरील मजुरी ३१२ रुपये वरून ५०० रुपये करा, पेरणी ते कापणीपर्यंत सर्व कामे चठएऋड मध्ये घ्या, मुख्यमंत्र्यांसोबत ७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीतील मागण्यांचा शासन निर्णय काढा. यासह विविध मागणीसाठी बच्चू कडू अन्नत्याग आंदोलन करणार आहे. सरकार जोपर्यंत या मागण्यांसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करत नाही; तोपर्यंत आंदोलन सुरु ठेवण्याची भूमिका बच्चू कडू यांनी स्पष्ट केली आहे.

दरम्यान अमरावती शहरातील गाडगेबाबा समाधी मंदिर ते गुरुकुंज मोझरी अशी १५ ते २० हजार लोकांची बाईक रॅली काढून गुरुकुंज मोझरी येथे सभा घेऊन सभेचे रूपांतर अन्नत्याग आदोलनात होईल; अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली. त्यामुळे ८ तारखेपूर्वी बच्चू कडू यांच्या मागण्यावर सरकार विचार करणार का? याकडे लक्ष लागल आहे. कारण बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राज्यभरातून प्रहारचे कार्यकर्ते येण्याची शक्यता आहे.